




महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक

# समर्थ गांवकरी

POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026

बुधवार, दि. १८ मार्च २०२६








मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे | नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 | पाने : ४ | वर्ष : ४थे | अंक : ११० | किंमत : ४ रूपये | Gmail : aklgavakari@gmail.com Gmail : punegavkari@gmail.com


# ॲसिडसदृश्य हल्ल्यात शालेय विद्यार्थिनी जखमी

## तपासासाठी विशेष पथक नियुक्तीचे पालकमंत्र्यांचे आदेश

**संगमनेर : (समर्थ गांवकरी)**

एका अज्ञात व्यक्तीने शालेय विद्यार्थिनीच्या चेहऱ्यावर ॲसिडसदृश्य द्रव फेकण्याचा खळबळजनक प्रकार घडला. आज, मंगळवारी दुपारी संगमनेर तालुक्याच्या ग्रामीण भागात ही घटना घडली. या प्रकरणी संगमनेर तालुका पोलिस ठाण्यात रात्री उशिरा गुन्हा दाखल झाला. जखमी मुलीवर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. आरोपींचा शोध घेतला जात असल्याची माहिती उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. कुणाल सोनवणे यांनी दिली. दरम्यान तपासासाठी विशेष पथक नियुक्त करण्याचे आदेश पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांनी दिले आहेत. हल्ल्यात जखमी झालेली मुलगी तिच्या कुटुंबियांसमवेत संगमनेर तालुक्याच्या ग्रामीण भागातील एका गावात नातेवाईकांकडे राहते. जखमी झालेल्या शालेय विद्यार्थिनीचे वय साधारण १२ वर्षे असून ती इयत्ता



सहावीच्या वर्गात शिकते. शाळेपासून तिचे घर लांब असल्याने ती सायकलवरून शाळेत ये-जा करते. शाळा सुटल्यानंतर नेहमीप्रमाणे ती मुलगी सायकलवरून घरी जात होती. शाळेपासून काही अंतर पुढे गेल्यानंतर दुचाकीहून आलेल्या अज्ञात व्यक्तीने तिच्या चेहऱ्यावर ॲसिडसदृश्य द्रव पदार्थ फेकला. त्यात तिचा चेहरा भाजला असून हातालाही जखमा झाल्या आहेत. तिच्या ओरडण्याचा आवाज ऐकून परिसरातील ग्रामस्थांनी धाव घेतली. तोपर्यंत हल्लेखोर तेथून पळून गेला होता. तिला प्राथमिक उपचारांकरता प्रथम एका खासगी रुग्णालयात आणि त्यानंतर अन्य रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

घटनेची माहिती मिळताच उपविभागीय पोलिस अधिकारी सोनवणे, तालुका पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक प्रवीण साळुंके, पोलिस उपनिरीक्षक शालोमन सातपुते आदी तातडीने घटनास्थळी पोहोचले. त्यांनी तपास सुरू करत हल्लेखोरांचा शोध सुरू केला. शालेय विद्यार्थिनीच्या चेहऱ्यावर ज्वलनशील फेकण्याची घटना अत्यंत दुर्दैवी आणि गंभीर असून पोलीसांना याबाबत तपासाच्या सूचना देण्यात आल्या आहेत. जिथे घटना घडली तिथे सीसीटीव्ही नाहीत.

### सोडले जाणार नाही

मंत्री अदिती तटकरे म्हणाले, मुलीच्या कुटुंबीयांसोबत बोलून माहिती घेऊ, अद्याप माहिती घेतली नाही. आमची मनोधैर्य योजना आहे, त्यातून आर्थिक सहाय्य देण्याच्या प्रस्तावाची मागणी केली आहे. या घटनेवर आम्ही बारकाईने लक्ष ठेऊन आहोत, पीडीता असेल, आई, मावशी असेल त्या घाबरलेल्या आहेत. मुलीवर उपचार करत नंतर इन्ट्रॉगेशन केले जाईल. आरोपीसंदर्भात तपास सुरु आहे, सीसीटीव्ही संदर्भात चौकशी सुरू आहे. आरोपीला सोडले जाणार नाही, कडक कारवाई केली जाईल.

### आमदार खताळ यांच्याकडून विधिमंडळात प्रश्न

आमदार अमोल खताळ यांनी आज विधानसभेत या घटनेचा विषय उपस्थित करून सरकारचे लक्ष वेधले. यावर महिला व बाल कल्याण मंत्री आदिती तटकरे यांनी घटनेची माहिती जिल्हा पोलीस अधीक्षकांकडून घेतली असून या विद्यार्थिनीला सर्वोतोपरी मदत करण्याची ग्वाही सभागृहात दिली.

### डॉ जयश्री थोरात यांच्याकडून जखमी मुलीची भेट

युवक काँग्रेसच्या तालुकाध्यक्ष डॉ. जयश्री थोरात यांनी रुग्णालयात जाऊन जखमी विद्यार्थिनीची भेट घेतली. मुलीच्या कुटुंबीयांशी संवाद साधला. या घटनेतील गुन्हेगारांना शोधून त्याच्यावर कठोर कारवाई करावी अशी आग्रही मागणी त्यांनी केली.

## थोडक्यात...



### ड्रग्स तस्करांवर मोक्का लावणार

नागपूर (समर्थ गांवकरी) : अखेर उपराजधानी नागपुरात ड्रग्स तस्करांवरील कारवाईला गती मिळाली असून आता ड्रग्स तस्करांवर मोका लागणार आहे. भाजप आमदार प्रवीण दटकेंच्या प्रश्नावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत ही ग्वाही दिली. पोलिस विभागाने डिसेंबर महिन्यात घातलेल्या धाडीत लाखोंचे ड्रग्स हस्तगत करण्यात आले तसेच ड्रग्स तस्करांवर NDPS अंतर्गत कारवाई करण्यात आली आहे. नागपुरात पोलिस विभागाने राबवलेली ऑपरेशन थंडर मोहिम अधिक व्यापक करण्याची मागणी तारांकित प्रश्नाच्या माध्यमातून प्रवीण दटके यांनी केली. ड्रग्स तस्करी थांबवण्यासाठी त्यांचावर मोका लावून राज्यात झिरो टोलरंस अभियान राबवणार असल्याने मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

### 1809 चा दुर्मिळ शिलालेख सापडला

गंगाखेड (समर्थ गांवकरी) : गंगाखेड येथील गोदावरी नदीकाठावर पुन्हा एकदा इतिहासाने आपले गूढ उलगडले असून, ब्रिटिशकालीन दुर्मिळ शिलालेखाच्या शोधामुळे इतिहास संशोधकांमध्ये मोठी उत्सुकता निर्माण झाली आहे. या शिलालेखातून आजवर कुठेही नोंद न झालेली माहिती प्रथमच समोर आली आहे. 20 डिसेंबर 1809 रोजी गोदावरी नदीत स्नान करत असताना मगरहल्ल्यात ब्रिटिश अधिकाऱ्याचा मृत्यू झाल्याचे या शिलालेखात नमूद आहे. गंगाखेड येथील मंदिराच्या पश्चिमेस सुमारे 300 मीटर अंतरावर, गोदावरी नदीकिनारी एका छोट्या ब्रिटिश कब्रस्थानाचे अवशेष आढळून आले. या ठिकाणी एका ब्रिटिश अधिकाऱ्याच्या स्मरणार्थ उभारलेले स्मारक असून, त्यासमोर 2 x 2 फूट आकाराच्या गुळगुळीत काळ्या बेसाल्ट दगडावर इंग्रजी भाषेत कोरलेला शिलालेख आढळला आहे. शिलालेखावरील अक्षरे कलात्मक व वळणदार असून, काही भाग अस्पष्ट झालेला आहे.

# अजित पवारांच्या अपघातासंदर्भात माझ्याकडे मोठी माहिती

**मुंबई : (समर्थ गांवकरी)**

दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमान अपघातावर चर्चा व्हावी यासाठी राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार हे सातत्याने प्रयत्न करत असल्याचे दिसून येत आहे. अधिवेशनात अजित पवार यांच्या विमान आपघातची चर्चा व्हावी, यासाठी अनेक दिवसापासून आम्ही सगळेच प्रयत्न करत आहोत. परंतू अजूनही या मुद्यावर चर्चा करू दिली जात नाही. मी विधानसभा अध्यक्षांची भेट घेतली व त्यांना चर्चा करण्याची विनंती केली असल्याची माहिती रोहित पवारांनी दिली आहे. रोहित पवार यांनी ट्विट करत म्हटले की, सहा वेळा राज्याचे उपमुख्यमंत्रीपद सांभाळलेल्या आणि 11 वेळा राज्याचे बजेट मांडलेल्या अजितदादांचा विमान अपघातात अकाली मृत्यू होऊनही या बाबीवर विधिमंडळात साधी चर्चाही होत नसेल तर हे अत्यंत दुर्दैवी आहे. त्यामुळेच विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर साहेब यांची भेट घेऊन अजितदादांच्या विमान अपघाताचा विषय विधीमंडळात चर्चेला घेऊन विस्तृत चर्चा करण्याची विनंती त्यांना केली आणि तसे निवेदनही दिले. अपेक्षा आहे की, अजितदादांचे योगदान आणि त्यांचा झालेला संशयास्पद अपघात या गोष्टी बघता अध्यक्ष महोदय चर्चेला परवानगी देतील. माध्यमांशी बोलताना रोहित पवार म्हणाले, अपघात संदर्भातील मोठी माहिती माझ्याकडे आहे. अगदी काही माहिती आम्ही आत्ता समोर आणली आहे. सरकार काय पाऊल उचलते हे बघू नाहीतर ती मोठी माहिती समोर आणू, असा इशारा पवारांनी दिला आहे. अजित पवार यांच्या सोबत सत्तेत असणारे किती स्मरण पत्र देणार, सत्तेत असून तुम्ही आपल्या माणसाला न्याय देऊ शकत नाही तुम्ही इतरांना काय न्याय देणार? असा सवालही त्यांनी उपस्थित केला आहे.



सरकार काय पाऊल उचलते बघू, अन्यथा...; रोहित पवारांचा थेट इशारा

# २७ महिला पदवी महाविद्यालयांना मंजुरी

**मुंबई : (समर्थ गांवकरी)**

राज्यात २०२६-२७ या शैक्षणिक वर्षात ३८ नवी महाविद्यालये सुरू करण्यास उच्च व तंत्र शिक्षण विभागाने मंजुरी दिली आहे. यामध्ये सर्वाधिक २७ महिला महाविद्यालयांचा समावेश आहे. ही सर्व महिला महाविद्यालये एसएनडीटी महिला विद्यापीठाशी संलग्न असणार आहेत. या सर्व महाविद्यालयांना कायम विनाअनुदानित तत्त्वावर मंजुरी देण्यात आली असून, त्यांना इरादापत्राचे वाटप करण्यात आले आहे. ही प्रस्तावित महाविद्यालये निमशहरी व ग्रामीण भागात असणार आहेत. राज्यातील विद्यापीठांनी २०२६-२७ या शैक्षणिक वर्षात नवीन महाविद्यालय सुरू करण्यासंदर्भात महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ नुसार 'नवीन महाविद्यालय मान्यता प्रणाली'द्वारे (एनसीपीएस) राज्य सरकारकडे प्रस्ताव सादर केला होता. निकषांची पूर्तता करणाऱ्या ३८ महाविद्यालयांना कायम विनाअनुदानित तत्त्वावर इरादपत्र मंजूर करण्यात आले आहे. महाविद्यालय सुरू करण्यास मान्यता देण्यात आलेल्या महाविद्यालयांमध्ये सर्वाधिक २७ महाविद्यालये ही महिला महाविद्यालये असून, ही सर्व महाविद्यालये मुंबईतील श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठाशी (एसएनडीटी) संलग्न आहे.

# डॉ. विश्वासराव आरोटे यांच्या हस्ते प.पू. जन्मेजय शरणजी महाराज व नानजीभाई ठक्कर यांचा सन्मान!

**जुन्नर : (समर्थ गांवकरी)**

डुंबरवाडी येथे माळशेज नागरी सहकारी पतसंस्था शाखेचे नवीन जागेत स्थलांतरित उद्घाटन उत्साहात पार पडले.या प्रसंगी प.पू. जन्मेजय शरणजी महाराज (अयोध्या) व समाजसेवक नानजीभाई खिमजीभाई ठक्कर ठाणावाला यांची प्रमुख उपस्थिती होती. या दोन्ही मान्यवरांचा सत्कार महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबई राज्य सरचिटणीस व दैनिक समर्थ गांवकरीचे संपादक डॉ. विश्वासराव आरोटे यांच्या हस्ते प्रभू श्रीराम मूर्ती, तुकाराम महाराज पगडी, शाल, विना, श्रीफळ, पेढे तसेच खारीक-खोबऱ्याचा हार देऊन करण्यात आला, यावेळी तुकाराम महाराज गाथा मंदिर देवस्थान संस्थापक अध्यक्ष हरिभक्त परायण पांडुरंग महाराज घुले, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रदेश प्रसिद्धी प्रमुख नवनाथ जाधव, योगी केशव बाबा चौधरी, माळशेज नागरी पतसंस्थेचे संस्थापक अध्यक्ष हरिभक्त परायण चंद्रकांत महाराज डुंबरे, नयनाताई डुंबरे, नामवंत उद्योजक अतुल नवले उपस्थित होते.



# सिलिंडर पुरवठ्याबाबत उच्च न्यायालयात सुनावणी

## केंद्र सरकारनं दिलं शपथपत्र, नेमकी काय दिली हमी?

**नागपूर : (समर्थ गांवकरी)**

घरगुती ग्राहकांसाठी एलपीजी सिलिंडरच्या तुटवड्याबाबत मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात याचिका दाखल करण्यात आली होती. केंद्र सरकारव्दारा देशात कोणतीही अडचण निर्माण होऊ नये यासाठी देशांतर्गत तसेच आंतरराष्ट्रीय पातळीवर सर्वतोपरी उपाययोजना तसेच वाटाघाटीचे प्रयत्न केल्या जात असल्याची हमी न्यायालयात दिल्यानंतर न्यायालयाने ही याचिका निकाली काढली. न्यायमूर्ती अनिल किलोर आणि न्यायमूर्ती राज वाकोडे यांच्या खंडपीठासमक्ष याचिकेवर सुनावणी झाली. याचिकेनुसार, इराण–इस्रायल संघर्षामुळे जागतिक स्तरावर कच्च्या तेलाच्या पुरवठ्यात अडथळे निर्माण झाले असून सौदी अरेबिया, संयुक्त अरब अमिराती आणि सीरिया या देशांमधून तेलाच्या हालचालीवर त्याचा परिणाम झाला आहे. परिणामी, एलपीजी उत्पादनावरही मर्यादा आल्या आहेत. या पार्श्वभूमीवर, देशांतर्गत ग्राहकांना प्राधान्य देण्यासाठी मंत्रालयाने एलपीजी उत्पादन आणि पुरवठ्याबाबत विशेष निर्देश जारी केले होते, असेही याचिकेत नमूद करण्यात आले. सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांनी शपथपत्र दाखल करत केंद्र सरकारची बाजू मांडली. शपथपत्रानुसार, आंतरराष्ट्रीय परिस्थितीत होत असलेल्या बदलांमुळे उद्भवणारा संभाव्य तुटवडा भारतावर परिणाम करू नये यासाठी केंद्र सरकार आवश्यक ती सर्व पावले उचलत असल्याचे स्पष्ट करण्यात आले. शपथपत्रात नमूद करण्यात आले की, "एलपीजीचा पुरवठा आणि वितरण सुरळीत राहावे यासाठी केंद्र सरकार देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर सर्व प्रयत्न करत आहे. आंतरराष्ट्रीय परिस्थितीत काही बदल होत असून त्यावर सरकार सतत लक्ष ठेवून आहे. त्या पार्श्वभूमीवर नागरिकांना कोणतीही अडचण भासू नये यासाठी आवश्यक ती सर्व सुधारात्मक पावले उचलली जात आहेत." सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांनी न्यायालयाला सांगितले की, हा विषय राजनैतिक पातळीवरही हाताळला जात असून सरकारवर विश्वास ठेवावा आणि याचिका निकाली काढावी. या संदर्भातील परिस्थिती सतत बदलणारी असल्याने देशहिताच्या दृष्टीने आवश्यक निर्णय घेण्याचे अधिकार केंद्र सरकारकडेच राहणे आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. तसेच, या विषयावर न्यायालयीन प्रक्रियेत सविस्तर चर्चा करणे योग्य ठरणार नाही, असेही शपथपत्रात नमूद करण्यात आले.




### निर्णय घेण्याची जबाबदारी सरकारची

स्थानिक पातळीवर कोणत्याही वितरकाकडून कर्तव्यात कसूर किंवा कायद्याचे उल्लंघन झाल्यास संबंधित प्राधिकरणांकडून कठोर कारवाई करण्यात येत असल्याचेही त्यात स्पष्ट केले आहे. या प्रकरणाचा परिणाम काही जिल्ह्यांपुरता मर्यादित नसून व्यापक स्तरावर होत असल्याने, याबाबत निर्णय घेण्याची जबाबदारी केंद्र आणि राज्य सरकारांवर सोपविणे योग्य ठरेल, असेही शपथपत्रात नमूद करण्यात आले. यावर समाधान व्यक्त करत न्यायालयाने याचिका निकाली काढली.




# धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज बलिदान मास

## मुकपदयात्रेत सर्वांनी सहभागी व्हावे : शिवप्रतिष्ठान हिंदुस्थान जामखेडचे नम्र आवाहन



**जामखेड तालुका (समर्थ गांवकरी)**

धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज बलिदान मास हा उपक्रम जामखेड तालुक्यातील हजारो शिवशंभुभक्त अत्यंत निष्ठेने पाळतात आणि यामध्ये सहभागी होतात.

श्री. शिवप्रतिष्ठाण हिंदुस्थानचे संस्थापक आदरणीय श्री. संभाजीराव भिडे गुरुजींच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम जामखेडसह देशातही पाळला जातो. यातुन छत्रपती शिवाजी व संभाजी राजेंच्या विचारांवर चालणारी एक आदर्श विचारांची फळी तयार व्हावी हाच एक महान उद्देश आहे.

धर्मवीर बलीदान मास पाळताना या महिनाभरात कोणी पायात पादत्राणे घालत नाही,कोणी गोड अन्न खाणे टाळतात,कोणी एकच वेळ जेवण करतात,कोणी गादीवर झोपत नाही,

कोणी आपल्या डोक्यावरील केस काढुन मुंडण करतात अशा अनेक प्रकारच्या त्यागातुन हा महिना अत्यंत कडवटपणे पाळुन आपल्या आदर्श राजांना आदरांजली वाहतात. यामध्ये लहान मुले,मुली, युवक, युवती, महीला आणि पुरुष वरील सर्व गोष्टींचा त्याग करतात व दररोज आपल्या शंभुराजेंना आदरांजली देण्यासाठी छत्रपती शिवाजी महाराज पेठेतील शनि मारुती मंदिर आणि हनुमान मंदीर तपनेश्वर रोड कुंभार गल्ली या दोन्हीही ठिकाणी येथे एकत्र येऊन श्री.संभाजी सुर्यऋदय श्लोक घेऊन अर्थासहीत स्पष्टीकरण देऊन आदरांजली वाहण्यात येते.

दरवर्षी छत्रपती संभाजी महाराजांच्या पुण्यतिथी निमित्ताने वढु बुद्रुक अर्थात संभाजी महाराज समाधी स्थळ येथून धर्मवीरज्वाला पायी आणली जाते त्याच अनुषंगाने यावर्षी सोमवार दि.१६/३/२०२६ रोजी अनेक धारकरी वढु बुद्रुक याठिकाणी गेले आणि आज मंगळवार दि.१७ मार्च २०२६ रोजी पायी ज्योत जामखेड या ठिकाणी घेऊन आलेले आहेत. सर्वांना दर्शनासाठी आणलेली धर्मवीर ज्वाला शनि मारुती मंदिरामध्ये ठेवलेली आहे. बुधवार दि.१८मार्च २०२६ रोजी शनि मारुती मंदीर, छत्रपती शिवाजी महाराज पेठ जामखेड येथुन जामखेड शहरामध्ये सायंकाळी ५:३० वाजता मुकपदयात्रा काढली जाणार आहे.

तरी शंभुराजेची न निघालेली अंत्ययात्रा ही धर्मवीर ज्वालेच्या रुपाने काढण्यात येते.

तरी दि १८ मार्च २०२६ रोजी सायंकाळी ठिक ५-३० सर्व शिवशंभुप्रेमींनी मुकपदयात्रेत सहभागी व्हावे असे आवाहन श्री. शिवप्रतिष्ठान हिंदुस्थानचे अध्यक्ष पांडुराजे भोसले यांनी केले आहे.

# अहिल्यानगर जिल्ह्यात वादळी पावसाची शक्यता

## *नागरिकांनी सतर्कता बाळगण्याचे जिल्हा प्रशासनाचे आवाहन*



**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

भारतीय हवामान खात्याच्या अंदाजानुसार अहिल्यानगर जिल्ह्यात १७ ते १९ मार्च २०२६ या कालावधीत वादळी वाऱ्यासह हलका ते मध्यम पाऊस व विजांच्या कडकडाटाची शक्यता वर्तविण्यात आली आहे. या पार्श्वभूमीवर जिल्ह्यासाठी १८ व १९ मार्च रोजी येलो अलर्ट जारी करण्यात आला असून, कोणत्याही प्रकारची जीवितहानी व वित्तहानी टाळण्यासाठी नागरिकांनी सुरक्षिततेची पुरेशी काळजी घ्यावी, असे आवाहन निवासी उपजिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे मुख्य कार्यकारी अधिकारी दादासाहेब गिते यांनी केले आहे. वीज चमकत असताना किंवा वादळी वारे वाहत असताना नागरिकांनी झाडांखाली, मोकळ्या मैदानात, विजेचे खांब व लोखंडी कुंपणाजवळ उभे राहू नये. वीज कोसळण्याची शक्यता असल्याने या काळात विजेच्या उपकरणांचा वापर टाळावा व ट्रॅक्टर्स, शेतीची अवजारे यांसारख्या सुवाहक वस्तूंपासून दूर राहावे. घराबाहेर मोकळ्या जागेत अडकल्यास गुडघ्यांवर बसून कान व डोके झाकून सुरक्षिततेची काळजी घ्यावी. जाहिरात फलक कोसळून अपघात होण्याची शक्यता असल्याने त्याजवळ थांबणे टाळावे. धरणे, नद्या व कालव्यांच्या परिसरात पर्यटनासाठी जाणाऱ्या नागरिकांनी पाण्याच्या प्रवाहात उतरू नये व धोकादायक ठिकाणी फोटो काढणे टाळावे. शेतकऱ्यांनी वादळी वारा व पावसापासून शेतमालाचे नुकसान टाळण्यासाठी योग्य नियोजन करावे, तसेच काढणीस आलेला शेतमाल व जनावरे सुरक्षित ठिकाणी हलवावीत. आपत्कालीन परिस्थितीत नागरिकांनी नजीकचे पोलीस ठाणे, तहसील कार्यालय किंवा जिल्हाधिकारी कार्यालयातील नियंत्रण कक्षाच्या १०७७ या टोल फ्री क्रमांकावर व ०२४१ – २३२३८४४ या दूरध्वनीवर तात्काळ संपर्क साधावा, असे आवाहनही श्री. गिते यांनी केले आहे.

# आंतरराष्ट्रीय ग्राहक हक्क दिन उत्साहात साजरा

**कळवण : (समर्थ गांवकरी)**



आदिवासी सेवा समिती, नाशिक संचलित कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, मानूर येथे अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष व वाणिज्य विभागाच्या वतीने ग्राहक संरक्षण व जागरूकतेचा संदेश देत आंतरराष्ट्रीय ग्राहक हक्क दिन उत्साहात साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांमध्ये ग्राहक हक्कांविषयी जागरूकता निर्माण करणे व सजग ग्राहक घडविणे हा या कार्यक्रमाचा उद्देश होता. प्रा.एस.एल. पवार यांनी ग्राहक संरक्षण कायद्याची पार्श्वभूमी, आंतरराष्ट्रीय स्तरापासून तर राष्ट्रीय स्तरापर्यंत कायदा कसा लागू झाला हे सविस्तर सांगितले तसेच आजच्या तंत्रज्ञानाच्या युगात ग्राहक संरक्षण कायद्यात कसा बदल झाला हे यावेळी अधोरेखित केले. विद्यार्थ्यांनी जागरूक ग्राहक बनून समाजात ग्राहक संरक्षणाबाबत जनजागृती करण्याची गरज अधोरेखित केली. तसेच शिक्षणाबरोबरच सामाजिक जाणीव असलेले नागरिक घडणेही तितकेच महत्त्वाचे आहे असे मत कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर.पी. भामरे यांनी व्यक्त केले.

दिनेश पाटील, सिद्धी शेवाळे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सविता भालेराव हिने व रोशनी देवरे हिने कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले, तर रत्ना गायकवाड हिने आभार प्रदर्शन करून कार्यक्रमाची सांगता केली. या कार्यक्रमास महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, प्रशासकीय कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# गुरुवारी शब्दगंधची महत्वपूर्ण बैठक

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

शब्दगंध साहित्यिक परिषदेच्या वतीने आयोजित करण्यात येणाऱ्या सतराव्या राज्यस्तरीय शब्दगंध साहित्य संमेलनाच्या आयोजना संदर्भात महत्वपूर्ण बैठक गुरुवार, दि. १९ मार्च रोजी सकाळी ११ वाजता जाधव लॉन्स, कल्याण रोड, अहिल्यानगर येथे आयोजित करण्यात आली आहे. सदर बैठक शब्दगंधचे अध्यक्ष राजेंद्र उदागे यांच्या अध्यक्षतेखाली होणार असल्याची माहिती राज्य संघटक प्रा. डॉ. अशोक कानडे व समाज माध्यम समन्वयक मकरंद घोडके यांनी दिली. शब्दगंध साहित्यिक परिषदेच्या सर्व सभासद व कार्यकारी मंडळाची ही संयुक्त बैठक असून, या बैठकीत संमेलनाच्या आयोजनाशी संबंधित विविध महत्त्वाच्या विषयांवर चर्चा होणार आहे.

## *जिल्हा आणि तालुका पंचायत सत्तेचा सूर्यास्त*

# प्रशासकीय कारभार सुरू, निवडणुकांची प्रतीक्षा

**डांग गुजरात : (समर्थ गांवकरी)**



डांग जिल्ह्यात स्थानिक स्वराज्य व्यवस्थेत एक महत्त्वाचा राजकीय टप्पा आला आहे. जिल्हा परिषद तसेच सुबीर, आहवा आणि वघई पंचायत समित्यांमधील निवडून आलेल्या प्रतिनिधींची पाच वर्षांची मुदत आज, दि. १७ मार्च २०२६ रोजी अधिकृतपणे संपली आहे.

पाच वर्षांपूर्वी मोठ्या बहुमताने सत्तेवर आलेले अध्यक्ष, विविध समित्यांचे सभापती आणि सदस्य आता अधिकृतपणे माजी झाले आहेत. डांग जिल्हा परिषदेचे एकूण १८ सदस्य तसेच तीनही पंचायत समित्यांतील एकूण ४८ प्रतिनिधींचा कार्यकाळ संपुष्टात आल्याने पंचायत सत्तेचा अध्याय संपला आहे. राज्यात जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांची मुदत संपूनही अद्याप नवीन निवडणुकांची घोषणा झालेली नाही. त्यामुळे डांगसह इतर जिल्ह्यांमध्येही तात्पुरत्या स्वरूपात प्रशासकीय कारभार लागू करण्यात आला आहे. राज्य सरकारच्या आदेशानुसार, डांग जिल्हा परिषदेचा कारभार आता जिल्हाधिकारी यांच्या हाती देण्यात आला आहे. तर तालुका स्तरावर प्रांत अधिकारी आणि सहाय्यक अधिकाऱ्यांची प्रशासक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. यापुढे सर्व धोरणात्मक आणि प्रशासकीय निर्णय हे या अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली घेतले जाणार आहेत.

या बदलामुळे डांग जिल्ह्यात राजकीय आणि सामाजिक वातावरण तापले आहे. लोकप्रतिनिधी नसल्यामुळे जनतेचे प्रश्न मांडले कसे जातील, याबाबत चर्चा सुरू झाली आहे. दुसरीकडे, आगामी निवडणुका कधी जाहीर होतील याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. दरम्यान, भाजप, काँग्रेस आणि आम आदमी पार्टीसारख्या प्रमुख राजकीय पक्षांनी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर आपली संघटनात्मक ताकद वाढवण्यासाठी हालचाली सुरू केल्या आहेत.

सध्या डांगमध्ये पंचायत स्तरावर लोकशाही व्यवस्थेचा एक टप्पा संपला असला तरी पुढील निवडणुकांचे बिगुल कधी वाजणार, हा प्रश्न अद्याप अनुत्तरितच आहे.

# दिव्यांगासाठी प्रायमस हॉस्पिटलच्यावतीने व्हीलचेअर भेट



**नेवासा : (समर्थ गांवकरी)**

नेवासा येथील संत ज्ञानेश्वर महाराज "पैस" खांब मंदिरात मासिक वद्य व शुद्ध वारीला दर्शनासाठी येणाऱ्या दिव्यांग व जेष्ठ नागरिकांसाठी नेवासा तालुका मेडीकल असोसिएशनच्या संकल्पनेतून मार्केट कमिटीचे माजी सभापती शंकरराव लोखंडे यांच्या प्रेरणेतून नेवासाफाटा येथील प्रायमस हॉस्पिटलच्या वतीने दोन व्हीलचेअर भेट देण्यात आल्या सदरच्या व्हील चेअर हया दिव्यांग व जेष्ठ नागरिकांच्या सेवेसाठी लोकार्पण करण्यात आल्या.

यावेळी झालेल्या व्हील चेअर सुविधा लोकार्पण कार्यक्रम प्रसंगी संत ज्ञानेश्वर महाराज देवस्थानचे प्रमुख मार्गदर्शक व विश्वस्त वेदांताचार्य हभप देविदासजी महाराज म्हस्के शास्त्री,विश्वस्त मंडळाचे अध्यक्ष माजी आमदार पांडुरंग अभंग यांनी दिव्यांग व जेष्ठ नागरिकांना सुलभतेने दर्शन घेता यावे यासाठी देवस्थान विश्वस्त मंडळाची ही ईच्छा होती आज प्रायमस हॉस्पिटलचे डॉ.निलेश लोखंडे यांनी सदरच्या व्हीलचेअर भेट दिल्याने

ती ईच्छा पूर्ण झाली आता देवस्थानच्या वतीने दिव्यांगांसह वयोवृध्द जेष्ठ नागरिकांनी व्हील चेअरद्वारे दर्शन करण्याची व्यवस्था करण्यात येईल असे पांडुरंग अभंग यांनी यावेळी बोलतांना सांगितले.

यावेळी बोलताना मेडिकल असोसिएशनचे अध्यक्ष डॉ.किशोर गळनिंबकर म्हणाले की आज मेडिकल असोसिएशनच्या संकल्पनेतून डॉ.निलेश लोखंडे यांच्या वतीने दिव्यांगांसाठी व्हीलचेअर उपलब्ध झाल्या आहेत आम्ही देखील येथे येणाऱ्या भाविकांच्या सेवेसाठी आरोग्य चिकित्सा व तपासणी शिबिर घेण्यासाठी प्रयत्न करू अशी ग्वाही यावेळी बोलताना दिली. यावेळी मेडिकल असोसिएशनच्या डॉक्टर मंडळींचा संत ज्ञानेश्वर महाराज देवस्थानच्या वतीने सत्कार करण्यात आला. यावेळी झालेल्या कार्यक्रम प्रसंगी नेवासा बाजार समितीचे माजी सभापती शंकरराव लोखंडे,पंचायत समितीचे माजी सभापती रावसाहेब कांगुणे,आदिनाथ महाराज पांगरे,मंदिर विश्वस्त विश्वस्त कृष्णाभाऊ पिसोटे, कैलास जाधव,नगरसेवक महेश लोखंडे,नेवासा तालुका मेडिकल असोसिएशनचे अध्यक्ष डॉ.किशोर गळनिंबकर, डॉ.शंकरराव शिंदे,स्त्री रोग तज्ञ डॉ.मनिषा वाघ,डॉ.निर्मला सांगळे,डॉ.संदीप देशमुख,डॉ.गणेश नांदे,डॉ.निलेश लोखंडे,डॉ.वरुणराज देवरे,औषध निर्माता संजय सुकाळकर,जालिंदर गोरे यांच्यासह असोसिएशनचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.देवस्थानचे जनसंपर्क अधिकारी आशिष कावरे यांनी उपस्थित मान्यवरांचे आभार मानले.

# डॉ. प्रतीक मुणगेकर यांची सदिच्छा भेट

**आळे : (समर्थ गांवकरी)**

ज्ञानेश्वर ग्रामोन्नती मंडळ आळे संचलित मा. बाळासाहेब जाधव कला वाणिज्य विज्ञान महाविद्यालयात जागतिक ख्यातीचे शास्त्रज्ञ, प्राध्यापक व आंतरराष्ट्रीय वक्ते डॉ. प्रतीक मुणगेकर यांनी सदिच्छा भेट दिली. त्यांच्या आगमनाने महाविद्यालय परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले. डॉ. मुणगेकर हे शिक्षण, संशोधन आणि नवोपक्रम क्षेत्रातील अग्रगण्य व्यक्तिमत्त्व असून त्यांनी हजारो विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले आहे. त्यांनी ६८,००० पेक्षा अधिक विद्यार्थ्यांना शिक्षण, ७७,००० विद्यार्थ्यांना करिअर मार्गदर्शन आणि १२,००० शिक्षकांना प्रशिक्षण दिले आहे. तसेच त्यांच्या नावावर १४ राष्ट्रीय पेटंट्स आणि १८ जागतिक विक्रम नोंदवले गेले आहेत.

# प्रभाग क्रमांक ७ : इफ्तार पार्टीचा भव्य सोहळा उत्साहात!



**शिर्डी : (समर्थ गांवकरी)**

प्रभाग क्रमांक ७ मधील नगरसेवक अमित दादा शेळके पाटील यांच्या वतीने इफ्तार पार्टीचे भव्य आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाला समाजातील विविध घटकांतील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित राहून सामाजिक एकात्मतेचा संदेश दिला. याप्रसंगी नगरसेवक अमित दादा शेळके पाटील यांनी मुस्लिम बांधवांना पवित्र रमजान-ईद महिन्याच्या हार्दिक शुभेच्छा दिल्या. त्यांच्या पुढाकाराने आयोजित करण्यात आलेल्या या इफ्तार पार्टीत मुस्लिम बांधवांचा उत्स्फूर्त सहभाग पाहायला मिळाला. कार्यक्रमाला महमूद भाई सय्यद, आमोल गोदकर, भैय्या कादरी, मोहसीन भाई पठाण यांसारखे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. तसेच अमित सोशल फाउंडेशनच्या पदाधिकाऱ्यांनीही मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला. यावेळी बोलताना नगरसेवक अमित दादा शेळके पाटील म्हणाले, "रमजानचा महिना हा प्रेम, त्याग आणि शांतीचा संदेश देणारा आहे. आपल्या प्रभागात सर्व समाजातील लोक गुण्यागोविंदाने राहतात, हाच आनंद साजरा करण्यासाठी या इफ्तार पार्टीचे आयोजन करण्यात आले."

# सतराव्या साहित्य संमेलनाच्या आयोजनावर चर्चा

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

शब्दगंध साहित्यिक परिषदेच्या वतीने आयोजित करण्यात येणाऱ्या सतराव्या राज्यस्तरीय शब्दगंध साहित्य संमेलनाच्या आयोजना संदर्भात महत्वपूर्ण बैठक गुरुवार, दि. १९ मार्च रोजी सकाळी ११ वाजता जाधव लॉन्स, कल्याण रोड, अहिल्यानगर येथे आयोजित करण्यात आली आहे. सदर बैठक शब्दगंधचे अध्यक्ष राजेंद्र उदागे यांच्या अध्यक्षतेखाली होणार असल्याची माहिती राज्य संघटक प्रा. डॉ. अशोक कानडे व समाज माध्यम समन्वयक मकरंद घोडके यांनी दिली. शब्दगंध साहित्यिक परिषदेच्या सर्व सभासद व कार्यकारी मंडळाची ही संयुक्त बैठक असून, या बैठकीत संमेलनाच्या आयोजनाशी संबंधित विविध महत्त्वाच्या विषयांवर चर्चा होणार आहे. यामध्ये संयोजन समितीची स्थापना, पोस्टर्स स्पर्धा, स्टॅन्डअप कॉमेडी शोचे आयोजन, राहाता तालुका कार्यकारी मंडळास मंजुरी, स्वागताध्यक्षांच्या नावाबाबत चर्चा, साहित्य संमेलनातील पुस्तक प्रकाशनासाठीचे नियम, तसेच काव्यसंमेलनासाठी आवश्यक अटी व नियम निश्चित करणे या मुद्द्यांचा समावेश आहे. याशिवाय सन २०२५ मधील पुस्तकांच्या परीक्षण समितीने दिलेल्या निकालास मान्यता देणे, तसेच माजी संमेलनाध्यक्षांच्या भाषणांचा ग्रंथ प्रकाशित करण्याबाबत चर्चा करून निर्णय घेण्यात येणार आहे. साहित्य संमेलन अधिक दर्जेदार आणि यशस्वी करण्यासाठी साहित्यिकांच्या कल्पना व संकल्पना प्रत्यक्षात उतरवण्याच्या दृष्टीने सर्व साहित्यिकांनी या बैठकीस उपस्थित राहावे, असे आवाहन शब्दगंधचे संस्थापक सुनील गोसावी, कार्याध्यक्ष ज्ञानदेव पांडुळे, उपाध्यक्ष डॉ. जी. पी. ढाकणे, कार्यवाह भारत गाडेकर, खजिनदार भगवान राऊत तसेच शिरीष जाधव, राजेंद्र पवार, राजेंद्र फंड, प्रशांत सूर्यवंशी, स्वाती ठुबे, जयश्री झरेकर आणि शर्मिला गोसावी यांनी केले.

# पडघा बस स्थानकात येणारी कल्याण बस बंद; प्रवाशांचा पायी प्रवास

## विद्यार्थी, महिला, ज्येष्ठ नागरिकांचे भर उन्हात हाल

**भिवंडी : (समर्थ गांवकरी)**



भिवंडी तालुक्यातील पडघे येथे येणारी कल्याण बस मागील काही दिवसांपासून मुख्य पडघा बस स्थानकात येत नसून ती फक्त पडघा प्रवेशद्वारापर्यंतच मर्यादित ठेवण्यात आली आहे. त्यामुळे प्रवाशांना मोठा त्रास सहन करावा लागत असून विशेषतः विद्यार्थी, वृद्ध आणि महिला प्रवाशांचे हाल होत आहेत. पूर्वी ही बस थेट पडघा बस स्थानकात येत होती. मात्र अचानक हा बदल झाल्याने प्रवाशांना सुमारे अर्धा किलोमीटर अंतर पायी चालत जावे लागत आहे. उन्हाळ्याचे दिवस सुरू असल्याने भर उन्हात बसची वाट पाहावी लागत असून नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. रात्रीच्या वेळी हायवेवर बस पकडताना महिला प्रवाशांच्या सुरक्षिततेचा प्रश्नही निर्माण होत असल्याची भीती स्थानिक नागरिकांनी व्यक्त केली आहे. चोरी व छेडछाडीच्या घटनांची शक्यता नाकारता येत नसल्याने ही परिस्थिती अधिक गंभीर ठरत आहे. दरम्यान, सामाजिक कार्यकर्ते योगेश जाधव यांनी पडघा ग्रामपंचायत मध्ये पत्रव्यवहार करून ही बस सेवा पुन्हा पडघा बस स्थानकात सुरू करण्याची मागणी केली आहे. तर पडघा येथील सामाजिक कार्यकर्ते शरद साने यांनी यापूर्वी सन २०२४ मध्ये पडघा पोलीस स्टेशन तसेच पडघा ग्रामपंचायत येथे अर्ज दिला होता की, पडघा बस स्थानक येते फोर व्हीलर, टू व्हीलर यांचा अतिक्रमण होत असून तो लवकरात लवकर हटवण्यात यावा. व मूळ रस्त्याची रहदारी मोकळी करण्यात यावी.तसेच शारदा विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, पडघे यांनी विद्यार्थ्यांच्या अडचणी लक्षात घेऊन 'शेरेकरपाडा' येथे अधिकृत बस थांबा देण्याची मागणी केली आहे. परिसरातील बहुतांश विद्यार्थी दुर्गम भागातून प्रवास करत असून ते पूर्णपणे एसटी बस सेवावर अवलंबून आहेत. सध्या पडघा कमानीपासून शाळेपर्यंत दीड ते दोन किलोमीटर अंतर विद्यार्थ्यांना पायी चालावे लागत असल्याने ते वेळेवर शाळेत पोहोचू शकत नाहीत. यामुळे विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर परिणाम होत असून, लवकर निघूनही शारीरिक थकवा जाणवत असल्याने त्यांच्या अभ्यासातील एकाग्रतेवरही परिणाम होत आहे. यासाठी हायवे जवळील 'पडघा कमानी' च्या पुढे असलेल्या'शेरेकरपाडा'येथे बसला अधिकृत थांबा देण्यात यावा. शेरेकरपाडा येथे बस थांबल्यास, तिथून शाळेचे अंतर कमी होईल आणि विद्यार्थ्यांना कमी कष्टात व कमी वेळेत शाळेत पोहोचता येईल. अशी मागणी शारदा विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय पडघे यांनी कल्याण बस डेपो मॅनेजर, कोकण पदवीधर मतदारसंघाचे आमदार निरंजन डावखरे कोकण शिक्षक मतदारसंघाचे आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे यांच्याकडे निवेदनाव्दारे केली आहे. या पार्श्वभूमीवर पडघा पोलिस ठाण्यात बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत संबंधित अधिकाऱ्यांशी चर्चा करण्यात आली. कल्याण बस डेपो व्यवस्थापकांनी लवकरच बस सेवा पुन्हा पडघा बस स्थानकापर्यंत सुरू करण्याचे आश्वासन दिले आहे. या बैठकीस पोलिस निरीक्षक जितेंद्र ठाकूर, सरपंच सायली पाटील, पंचायत अधिकारी भास्कर घुडे, अशोक शेरेकर, शैलेश बिडवी, डॉ. संजय पाटील, दिनेश गंधे, रवी विशे, अभिषेक नागावेकर, मयूर गंधे, अशोक गायकवाड व काळुराम गायकवाड आदी मान्यवर उपस्थित होते. दरम्यान, पडघा बस स्थानकात भिवंडी व कल्याण आगाराकडून देखरेख अधिकारी नियुक्त करावेत, अशी भावना स्थानिक नागरिकांनी पत्रकारांशी बोलताना व्यक्त केली. 'बहुजन हिताय, बहुजन सुखाय' हे ब्रीदवाक्य जपणाऱ्या एसटी महामंडळाकडून नागरिकांना सकारात्मक प्रतिसाद मिळेल का, याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

# मोफत शिलाई प्रशिक्षण केंद्राचे भव्य उद्घाटन!

- अभिनेत्री कृष्णा गौतम व खासदार भाऊसाहेब वाकचौरे यांच्या पुढाकारातून कोतुळमध्ये महिलांसाठी शिलाई प्रशिक्षण केंद्र सुरू!



**कोतुळ : (समर्थ गांवकरी)**

शिर्डी मतदारसंघाचे खासदार भाऊसाहेब वाकचौरे साहेब आणि चित्रपट अभिनेत्री तथा समाजसेविका कृष्णा गौतम यांच्या विशेष प्रयत्नातून कोतुळ येथे महिलांच्या सक्षमीकरणासाठी शिलाई मशीन प्रशिक्षण केंद्राचा भव्य उद्घाटन सोहळा उत्साहात पार पडला. “टीचिंग फ्युचर” या उपक्रमांतर्गत सुरू करण्यात आलेला हा तीन महिन्यांचा कौशल्य विकास प्रशिक्षण कार्यक्रम “नीड फॉर गुड फाउंडेशन” या संस्थेचा एक महत्त्वाचा प्रकल्प आहे. या प्रकल्पाचा मुख्य उद्देश महिलांना आणि गरजू व्यक्तींना स्वावलंबी बनवणे तसेच त्यांना व्यावहारिक आणि व्यवसायाभिमुख कौशल्ये प्रदान करून उपजीविकेची संधी निर्माण करून देणे हा आहे.

या प्रशिक्षण केंद्रामध्ये महिलांना शिलाई आणि शिवणकामाचे प्रत्यक्ष प्रशिक्षण दिले जाणार असून, त्यातून त्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम होण्यासोबतच आत्मविश्वास वाढण्यास मोठी मदत होणार आहे. या उपक्रमाला खासदार भाऊसाहेब वाकचौरे यांचा विशेष पाठिंबा लाभला असून, संबंधित संस्थेच्या माध्यमातून कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी (CSR) अंतर्गत निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. यावेळी बोलताना अभिनेत्री कृष्णा गौतम यांनी सांगितले की, “खरा बदल संधीपासून सुरू होतो. आमच्या फाउंडेशनच्या माध्यमातून कौशल्याधारित शिक्षण देऊन समाजात सन्मान, स्वावलंबन आणि दीर्घकालीन विकास साधण्याचा आमचा प्रयत्न आहे.” त्यांनी पुढे सांगितले की, त्यांचे कार्य केवळ मनोरंजन क्षेत्रापुरते मर्यादित नसून समाजातील दुर्बल घटकांच्या उन्नतीसाठी विविध उपक्रम राबविण्यावर त्यांचा भर आहे.

नीड फॉर गुड फाउंडेशनच्या माध्यमातून बेघर मुलांचे पुनर्वसन, आरोग्य शिबिरे, आरोग्य जनजागृती, माता व बाल आरोग्य, कुटुंब कल्याण, संसर्गजन्य व जीवनशैलीजन्य आजारांबाबत जागरूकता निर्माण करणे यासारख्या अनेक सामाजिक कार्यात सक्रिय सहभाग घेतला जातो. तसेच विद्यार्थ्यांना आवश्यक शैक्षणिक साहित्य उपलब्ध करून देणे आणि त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध कार्यक्रम राबविणे हेही संस्थेचे ध्येय आहे.

१० फेब्रुवारी २०१६ रोजी स्थापन झालेली “नीड फॉर गुड फाउंडेशन” (पूर्वीचे नाव त्रिशा केअर फाउंडेशन) ही एक सार्वजनिक धर्मादाय संस्था असून, समाजात बंधुत्व, सहकार्य, प्रेम आणि आपुलकीची भावना निर्माण करण्यासाठी सातत्याने कार्यरत आहे. सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक आणि सांस्कृतिक प्रगतीसाठी संस्था सक्रिय भूमिका बजावत आहे. या उपक्रमामुळे कोतुळ परिसरातील महिलांना स्वावलंबनाचा नवा मार्ग मिळणार असून, त्यांच्या आयुष्यात सकारात्मक बदल घडवण्यास मदत होणार आहे.

# इगतपुरी ब्रेक : आदिवासींचा उलगुलान, मंत्रालयावर धडकण्याचा इशारा!



**इगतपुरी : (समर्थ गांवकरी)**

आदिवासी समाजाच्या विविध मागण्यांसाठी अखिल भारतीय आदिवासी विकास परिषद यांच्या वतीने मोठ्या आंदोलनाची हाक देण्यात आली असून, हजारो आदिवासी बांधव रेल्वे व महामार्गाने मुंबईतील मंत्रालयावर धडक देणार आहेत. या आंदोलनादरम्यान आदिवासी विकास मंत्री अशोक उईके यांना घेराव घालण्याचा इशारा देण्यात आला आहे.

आंदोलनकर्त्यांनी मांडलेल्या प्रमुख मागण्यांमध्ये आदिवासींचे आरक्षण बंजारा समाजाला देऊ नये, ही महत्त्वाची मागणी आहे. तसेच पंडित दीनदयाल उपाध्याय योजना अंतर्गत असलेली ४० हजार रुपयांची मर्यादा रद्द करून सर्व विद्यार्थ्यांना सरसकट लाभ देण्यात यावा व ग्रामीण भागातही ही योजना प्रभावीपणे राबवावी, अशी मागणी करण्यात आली आहे. दरम्यान, मागण्या मान्य न झाल्यास आंदोलन तीव्र करण्याचा इशारा देण्यात आला असून, मराठवाडा व मुंबईकडे जाणारे पाणी रोखण्यासह धरण फोडण्यासारखे टोकाचे पाऊल उचलण्याचा इशाराही आंदोलनकर्त्यांनी दिला आहे. या पार्श्वभूमीवर प्रशासन सतर्क झाले असून, परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवले जात आहे.

# चांदणी चौक येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक व पूर्णाकृती पुतळा उभारण्याची मागणी

- आंबेडकर जयंती पूर्वतयारी बैठकीत प्रस्ताव
- जागा मिळाल्यास पुतळा देण्याची उमेश कांबळे यांची तयारी



**पुणे : (समर्थ गांवकरी)**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त पुणे महानगरपालिकेत पूर्वतयारीसाठी विशेष बैठक पुणे महापालिकेत आयोजित करण्यात आली होती, या बैठकीत चांदणी चौक येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक व पूर्णाकृती पुतळा उभारण्याची मागणी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) पक्षाचे युवक राज्य संघटक उमेश कांबळे यांनी केली, तसेच जागा मिळाल्यास पुतळा देण्याची तयारी उमेश कांबळे यांनी दर्शविली. या बैठकीला पुण्याच्या महापौर मंजुषा नागपुरे, उपमहापौर परशुराम वाडेकर, पुणे महानगरपालिका आयुक्त नवल किशोर राम तसेच महानगरपालिकेचे सर्व सन्माननीय नगरसेवक, पोलीस अधिकारी आणि विविध विभागांचे अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी आंबेडकर चळवळीतील विविध राजकीय पक्षांचे कार्यकर्ते, विविध मंडळांचे अध्यक्ष व सदस्य देखील उपस्थित होते. बैठकीदरम्यान उपस्थितांना आपले मत मांडण्याची संधी देण्यात आली. त्यावेळी पुणे महानगरपालिकेत नव्याने समाविष्ट झालेल्या २३ गावांच्या दृष्टीने शहराचे पश्चिम प्रवेशद्वार मानल्या जाणाऱ्या चांदणी चौक येथे विश्वरत्न महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे भव्य स्मारक आणि पूर्णाकृती पुतळा उभारण्याची मागणी करण्यात आली. यावेळी बोलताना संबंधित उमेश कांबळे यांनी सांगितले की, पुणे महानगरपालिकेने यासाठी योग्य जागा उपलब्ध करून दिल्यास त्यांच्या ‘विकास प्रतिष्ठान’ संस्थेच्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पूर्णाकृती पुतळा महानगरपालिकेला देण्याची तयारी आहे. या प्रस्तावाला उपस्थितांकडून सकारात्मक प्रतिसाद मिळाल्याचेही यावेळी सांगण्यात आले.

# कत्तलीकरिता जाणाऱ्या गाईंची सुटका

**रावेर : (समर्थ गांवकरी)**

महाराष्ट्र व मध्य प्रदेश सेमीलगत असलेल्या शेडीया अंजन गावाकडुन पाल गावाकडे सुकीनदीचे पात्रातुन महाराष्ट्रात चोरट्या मार्गाने गाईना आरोपी नामे जहांगिर हसन तडवी, वय 36 वर्ष, रा. बोरव्हाल ता. झिरण्या जि. खरगोन (म.प्र.)हा गाईना काठीने जोरजोरात मारत अत्यंत निर्दयतेने त्यांना कुठल्याही चा-या पाण्याची सोय न करता क्रुरपणे भुकेल्या अवस्थेत घेवुन येत असल्याची माहिती मिळाल्याने मा.पोलीस निरीक्षक सो श्री डॉ. विशाल जयस्वाल यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार जगदिश पाटील व कल्पेश आमोदकर पोलीस स्टाफ यांनी पाल गावातील कृषी विज्ञात केंद्राचे पुढे स्मशानभुमी जवळ सुकीनदी पात्रात 7 गाई किंमत अंदाजे 56000 ह्या कत्तल करण्याचे उद्देशाने घेवुन जात असल्याची खात्री झाल्याने त्यांची सुटका करण्यात आली असुन सदर गाई ह्या गोशाळेत दाखल करून आरोपीचा विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

# भगवान अग्रसेन चॅरिटेबल फाउंडेशनतर्फे भव्य सामूहिक विवाह सोहळा संपन्न

- उपक्रमाचे यंदा १३ वे वर्ष; २० जोडपी विवाहबंधनात

**पुणे : (समर्थ गांवकरी)**



सामाजिक बांधिलकी जपत गरीब व गरजू कुटुंबांना आधार देणाऱ्या भगवान अग्रसेन चॅरिटेबल फाउंडेशनतर्फे आयोजित भव्य सामूहिक विवाह सोहळा रविवारी उत्साहात पार पडला. या सोहळ्यात २० जोडपी विवाहबंधनात अडकली.

गंगाधाम रोड येथील गोयल गार्डन, आईमाता मंदिरासमोर सुमारे तीन एकर परिसरात भव्य मंडप उभारून हा सोहळा पार पडला. ज्येष्ठ समाजसेवक रतनलाल गोयल यांच्या ७३व्या वाढदिवसानिमित्त या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

हिंदू धर्मीय परंपरेनुसार सर्व विवाह विधी पार पडले. नवविवाहित जोडप्यांना सामाजिक, राजकीय व उद्योग क्षेत्रातील मान्यवरांनी उपस्थित राहून आशीर्वाद दिले. यामध्ये माजी आमदार मोहन जोशी, उद्योजक कृष्णकुमार गोयल, श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती मंदिर ट्रस्टचे अध्यक्ष सुनील रासने, माजी नगरसेवक अभय छाजेड, प्रवीण चोरबोले, गीता गोयल यांच्यासह लायन्स क्लबचे पदाधिकारी आणि विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. फाउंडेशनचे विश्वस्त राजेश अग्रवाल यांनी सांगितले की, वाढत्या सामाजिक व आर्थिक विषमतेच्या पार्श्वभूमीवर सामूहिक विवाह सोहळे ही काळाची गरज बनली आहे. विवाह समारंभांवरील अवाजवी खर्चामुळे अनेक कुटुंबांवर आर्थिक ताण येतो. विशेषतः मुलीच्या विवाहाची चिंता पालकांसाठी मोठे ओझे ठरते. अशा वेळी सामूहिक विवाह सोहळे समाजात एकात्मता, सहकार्य आणि सामाजिक जबाबदारीचा सकारात्मक संदेश देतात.

या सोहळ्यात विवाहबंधनात अडकलेल्या प्रत्येक जोडप्याला कपाट, पंखा, गादी, चादर, मिक्सर, देव्हारा तसेच भांडी-कुंडी संच असे गृहउपयोगी साहित्य भेटस्वरूप देण्यात आले. तसेच वधू-वरांना संपूर्ण वस्त्रसंच, मंगलसूत्र आणि आवश्यक वैवाहिक साहित्यही प्रदान करण्यात आले.

या उपक्रमाचे यंदा १३वे वर्ष असून मागील १३ वर्षांत एकूण २६१ जोडप्यांचे विवाह या माध्यमातून लावण्यात आले आहेत. गोयल कुटुंबाच्या सामाजिक जाणिवेतून साकारलेला हा उपक्रम गरीब व सर्वसामान्य कुटुंबांना सन्मानाने वैवाहिक जीवनाची नवी सुरुवात करण्याची संधी देणारा ठरत असल्याचे मत नवीन गोयल, वेदप्रकाश गुप्ता, विनोद जालान, विनोद अग्रवाल आणि आशीष गोयल यांनी व्यक्त केले.

# सायंकाळच्या लोडशेडिंगच्या वेळेत बदल करा : खा. नीलेश लंके

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**



अहिल्यानगर दक्षिण मतदारसंघात सध्या सुरू असलेल्या सिंगल फेज वीज लोडशेडिंगच्या वेळेबाबत खासदार नीलेश लंके यांनी महावितरण प्रशासनाकडे तातडीने बदल करण्याची मागणी केली आहे. सध्या मतदारसंघातील बहुतांश भागामध्ये सायंकाळी ६.०० ते रात्री १०.०० या कालावधीत सिंगल फेज वीज लोडशेडिंग करण्यात येत आहे. ही वेळ नागरिकांच्या दैनंदिन जीवनातील अत्यंत महत्त्वाची असून या काळात वीज नसल्याने सर्वसामान्य जनतेला मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे. सध्या शालेय परीक्षा सुरू असल्यामुळे विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी आवश्यक वीजपुरवठा मिळत नाही. तसेच सायंकाळची वेळ ही स्वयंपाकाची असल्याने गृहिणींनाही मोठ्या गैरसोयींचा सामना करावा लागत आहे. याशिवाय, काही भागांमध्ये बिबट्याचा वावर असल्याने अंधाराच्या वेळेत नागरिकांच्या सुरक्षिततेचाही गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. या संदर्भात मतदारसंघातील नागरिकांनी लेखी तसेच प्रत्यक्ष भेटून अनेक तक्रारी केल्या आहेत. या सर्व बाबींचा विचार करून सायंकाळी ६.०० ते रात्री १०.०० या वेळेत होणाऱ्या लोडशेडिंगच्या वेळेत तातडीने बदल करून ते दिवसा करण्यात यावे, अशी मागणी खासदार लंके यांनी महावितरणच्या अधीक्षक अभियंत्यांकडे केली आहे.

# महिला दिनाचे औचित्य साधुन उत्साहात नवागतांचे स्वागत



**इंदापूर : (समर्थ गांवकरी)**

आज जिल्हा परिषद प्राथमिक शाळा काळेवाडी नं १ या ठिकाणी शैक्षणिक वर्ष २०२६ : २०२७ ची सुरुवात सर्व मुलांना मोफत सुलेखन वही पेन्सिल पहिलीतील मुलांचे गुलाब पुष्प व गोड खाऊ देऊन स्वागत केले. नविन शैक्षणिक वर्षाची सुरुवात ही १६ मार्च पासुन उत्साहाने केली .शाळेच्या प्रगतीचा आलेख पाहुन इंग्रजी माध्यमातील दोन पालकांनी आपल्या पाल्यांचा या शाळेत प्रवेश घेतला.त्यामुळे इतर शाळांच्या तुलनेत जिल्हा परिषद शाळेत मुलांचा सर्वागीण विकास होतो .असे मत शाळा व्यवस्थापनचे अध्यक्ष श्री.वनराज पोटे यांनी व्यक्त केले.

शैक्षणिक वर्षाच्या सन २०२६ : २०२७ या प्रवेशा वेळी डाळज केंद्राचे केंद्र प्रमुख शशिकांत गावडे साहेब यांनी बोलताना सांगितले की पालक व शिक्षक यांच्यातील आंतर क्रिया घडुन आली की नक्कीच शाळेची प्रगती होती. विद्यार्थी सर्वांगिण विकासात जिल्हा परिषद शाळेचा सिंहाचा वाटा असतो. त्यामुळे सर्व पालकांनी आपल्या जिल्हा परिषद शाळेत आपल्या पाल्याचा प्रवेश घेऊन आदर्श निर्माण करावा असे आव्हान केले. या कार्यक्रमात महिला दिनाचे औचित्य साधुन रुपरेषा करुन महिलासाठी महिलांना पैठणी , कुकर व टी - सेट अशा स्वरुपाचे बक्षिस देऊन विजेत्या महिलांचा सन्मान करण्यात आला. या वेळी मोठ्या प्रमाणात महिला वर्ग सहभागी होता . सर्व उपस्थित महिला वर्गाला माँ के नाम एक पेड म्हणुन गुलाबाचे रोप देऊन यथोचित सन्मान करण्यात आला.

या कार्यक्रमासाठी पळसदेव ग्रामपंचायतीच्या सदस्या सौ दिपाली महेंद्र काळे ताई यांनी ही मनोगत व्यक्त गेले . या वेळी ग्रामपंचायत मा. सरपंच श्री. अजिनाथ पवार.व शाळा व्यवस्थापन उपअध्यक्ष श्री.अतुल काळे , श्री. सोमनाथ काळे , सागर गांधले , अनिकेत काळे. उपस्थित होते. या कार्यक्रमाचे नियोजन उपक्रमशील शिक्षिका सौ.कांचन रणपिसे , अंगणवाडी सेविका संगिता चव्हाण , व मदतनीस मिराताई नाईकवाडी. यांच्या संकल्पनेतुन झाला. या वेळी सर्व महिला वर्गाना जेवणाची सोय करण्यात आली. उत्साहात महिला दिनाचा कार्यक्रम प्राथमिक शाळा काळेवाडी नंबर 1 येथे प्रथमच सर्व महिलांमधून राबवण्यात आला त्यामुळे महिलावर्ग यांनी उत्साहात तो साजरा केला.या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन सन्मान संतोषजी हेगडे सर यांनी केले. कार्यक्रमाचे प्रस्ताविक मुख्याध्यापक श्री.प्रताप शिरसट सर व आभार उपशिक्षिका सौ.कांचन रणपिसे मॅडम यांनी मानले.

# फॅबइंडियाने केली गुढी पाडवा कलेक्शनची घोषणा

**पुणे : (समर्थ गांवकरी)**



महाराष्ट्रातील नववर्षाचा उत्साहपूर्ण सण गुढी पाडवा जवळ येत असताना, फॅबइंडियाने आपल्या खास गुढी पाडवा कलेक्शनची घोषणा केली आहे. परंपरेत गुंफलेली समृद्धी आणि उत्साह साजरा करण्यासाठी तयार केलेल्या या कलेक्शनमध्ये पुरुष आणि महिलांसाठी आकर्षक पोशाखांची खास निवड आहे. पारंपरिक विणकाम आणि आधुनिक शैली यांचा सुंदर संगम या संग्रहात दिसून येतो. महिलांसाठीच्या या कलेक्शनमध्ये आकर्षक हँड-ब्लॉक प्रिंट साड्या, सिल्क एम्ब्रॉइडरी कुर्ते, तसेच बनारसी आणि चिकनकारी दुपट्ट्यांची पारंपरिक देखणी झलक पाहायला मिळते. पुरुषांसाठी या संग्रहात विविध प्रकारचे शर्ट, शॉर्ट आणि लॉन्ग कुर्ते, तसेच उत्कृष्ट कारागिरी दर्शवणारे बंधगला जॅकेट्स उपलब्ध आहेत.

## जाहीर नोटीस

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी अकोले यांचे कार्यालय ता. अकोले, जि. अहमदनगर यांचे न्यायालयात...**

क्र.कावि/जन्म/मृत्यु नोंद/२५/२०२५ अकोले दि. ०८/०८/२०२५

तमांम नागरिकांस कळविण्यात येते की,

ज्याअर्थी अर्जदार **श्रीम. रक्मिणी अशोक रोकडे, रा. वडगाव लांडगा**, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर यांनी जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ कलम १३(३) अन्वये **अर्जदार यांची सासु कै. कौसाबाई उर्फ कासाबाई संभाजी रोकडे यांचा मृत्यू दि. ०४/०५/१९६८** रोजी **अकोले** येथे झाला असुन त्यांच्या मृत्यूची नोंद **मुख्याधिकारी नगरपंचायत अकोले**, ता.अकोले यांचे जन्म–मृत्यु रजिस्टरला नोंद आदेश होणेकामीचा अर्ज मे तहसिल कार्यालय येथे दाखल केला आहे.

तरी **श्रीम. रक्मिणी अशोक रोकडे, रा. वडगाव लांडगा**, ता. संगमनेर जि. अहिल्यानगर **अर्जदार यांची सासु कै. कौसाबाई उर्फ कासाबाई संभाजी रोकडे यांचा मृत्यू दि. ०४/०५/१९६८** रोजी **अकोले** येथे झाला असल्याची नोंद **मुख्याधिकारी नगरपंचायत अकोले**, ता. अकोले येथे मृत्यूची नोंद होण्याबाबत कोणाची काही हरकत अगर तक्रार असल्यास त्यांनी सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाचे आत योग्य त्या कागदपत्राच्या पुराव्यांसह हरकत मे. कोर्टासमोर हजर होऊन पुराव्या निशी दाखल करावी अन्यथा सदर मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत प्राप्त न झाल्यास सदर मृत्यूची नोंद करण्यास कोणाचीही हरकत नाही, असे समजुन मे. न्यायालय पुढील योग्य तो आदेश पारीत करण्यात येईल. तदनंतर कोणाचीही कोणतीही तक्रार ग्राहय धरली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

आज दि. ०८/०८/२०२५ रोजी सही व शिक्कयानिशी दिले असे.

**हुकूमावरुन,**

**कामगिरी क्लर्क** **तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अकोले**

# AURA 2.0 तंत्रज्ञान महोत्सवात विद्यार्थ्यांचा मोठा सहभाग



**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

विळद घाट येथील डॉ.विठ्ठलराव विखे पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयातील कॉम्प्युटर सायन्स अँड डिझाईन विभागामार्फत आयोजित करण्यात आलेला “AURA 2.0” तंत्रज्ञान महोत्सव मोठ्या उत्साहात पार पडला. तीन दिवसीय महोत्सवात ७०० हून अधिक विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत आपली तांत्रिक क्षमता, सर्जनशीलता आणि नवकल्पना सादर केल्या.

दरवर्षी आयोजित करण्यात येणारा AURA हा तंत्रज्ञान महोत्सव विद्यार्थ्यांना संगणक क्षेत्रातील कौशल्य दाखविण्यासाठी महत्त्वाचे व्यासपीठ ठरत आहे.“कोड, कंपीट अँड कॉनकुअर या संकल्पनेवर आधारित या महोत्सवातून विद्यार्थ्यांना कोडींग, सॉफ्टवेअर निर्मिती, सर्जनशील डिझाईन, प्रकल्प सादरीकरण, तांत्रिक स्पर्धा तसेच विविध उपक्रमांद्वारे आपली क्षमता सिद्ध करण्याची संधी मिळाली. कॉम्प्युटर सायन्स अँड डिझाईन स्टुडन्ट असोसिएशनच्या माध्यमातून आयोजित करण्यात आलेला हा महोत्सव विद्यार्थ्यांमध्ये स्पर्धात्मकता, तांत्रिक विचारसरणी आणि नवनवीन तंत्रज्ञानाशी जोड निर्माण करण्यासाठी प्रेरणादायी ठरला. या महोत्सवात विविध आकर्षक आणि रोमांचक स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. त्यामध्ये बग ऑक्शन , टेक ट्रेझरर , प्रकल्प स्पर्धा, बॉक्स क्रिकेट स्पर्धा , मिस्टरी गेम , ई-क्रीडा स्पर्धा, प्रॉम्प्ट शो डाऊन ट्रेझरर हंट अशा अनेक उपक्रमांचा समावेश होता. या सर्व स्पर्धांमधून विद्यार्थ्यांच्या कोडींग कौशल्य, सर्जनशीलता, तांत्रिक विचारशक्ती आणि समूहकार्याची कसोटी लागली. विविध स्पर्धांमध्ये उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांना रोख पारितोषिक, प्रशस्तीपत्रक आणि सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले.

महोत्सवाचे उद्घाटन तांत्रिक संचालक प्रा. सुनिल कल्हापुरे यांच्या हस्ते झाले. यावेळी बोलताना त्यांनी सांगितले की, आजच्या स्पर्धात्मक युगात केवळ पाठ्यपुस्तकातील ज्ञान पुरेसे नसून विद्यार्थ्यांनी तांत्रिक प्रयोग, संशोधन आणि नवकल्पना यावर भर दिला पाहिजे. अशा प्रकारचे तंत्रज्ञान महोत्सव विद्यार्थ्यांच्या बौद्धिक क्षमतेला चालना देतात आणि त्यांच्या नेतृत्वगुणांना व समस्या निराकरण क्षमता विकसित होते . “कोड, कंपीट अँड कॉनकुअर " ही संकल्पना विद्यार्थ्यांना केवळ स्पर्धेत जिंकण्यासाठी नाही तर जीवनात यशस्वी होण्यासाठी प्रेरित करणारी आहे. भविष्यातील तंत्रज्ञान क्षेत्रात आघाडी घेण्यासाठी विद्यार्थ्यांनी सातत्याने शिकत राहणे आणि नवनवीन कल्पना प्रत्यक्षात आणणे आवश्यक असल्याचेही त्यांनी सांगितले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी संगणक विज्ञान व डिझाईन विभागप्रमुख डॉ.रविंद्र तांबे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रा.पूजा काजळे यांनी शिक्षक समन्वयक म्हणून महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. तसेच विभागातील सर्व प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थ्यांनीही नियोजनबद्ध पद्धतीने काम करत हा महोत्सव यशस्वी केला.

या महोत्सवाच्या यशस्वी आयोजनाबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रविंद्र नवथर, तांत्रिक संचालक प्रा. सुनिल कल्हापुरे, सेक्रेटरी जनरल डॉ. पी.एम. गायकवाड तसेच संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी माजी खा.डॉ. सुजय विखे पाटील,संस्थेचे अध्यक्ष महाराष्ट्र राज्याचे जलसंपदा मंत्री व अहिल्यानगर जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांनीही या उपक्रमाचे कौतुक करत विद्यार्थ्यांच्या तांत्रिक प्रगतीसाठी अशा उपक्रमांचे महत्त्व अधोरेखित केले.

**Agasti Sahakari Sakhar Karkhana Ltd, Agastinagar**
Tal-Akole Dist - Ahilyanagar
ph (02424) 222775/297126 Email - agastisakhar@rediffmail.com

**TENDER NOTICE FOR SALE OF Ethanol**

We are in Market to sale Following spirit immediately as

| Sr. No. | Kind of Spirit | Quantity (Ltrs.) |
|---|---|---|
| 1 | B-Heavy Ethanol of Season 2025-26 | 3.50 Lakh Ltrs. |
| 2 | SDS Grade-2 of Season Season 2025-26 | 0.70 Lakh Ltrs. |

The purchasers are requested to send your highest quote rate by mail on or before dt 20/03/2026 at karkhana site karkhana reserves right to accept / cancelled / reject any or all tenders without assigning any reason

**(Sudhir Kapdnis)** Managing Director
**(Smt. Sunitatai Bhangare)** Vice Chairman
**(Sitaram Patil Gaikar)** Chairman

# लॉजवर पोलिसांचा छापा; दोन महिलांची सुटका, मालकाविरुद्ध गुन्हा दाखल!



**अकोले : (समर्थ गांवकरी)**

अहिल्यानगर जिल्ह्यातील अकोले शहरातील लॉजमध्ये सुरू असलेल्या अवैध व्यवसायावर पोलिसांनी पुन्हा एकदा मोठी कारवाई करत दोन महिलांची सुटका केली असून लॉज मालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेमुळे शहरात खळबळ उडाली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, अकोल्यातील महात्मा फुले चौक परिसरातील 'राज रेस्ट हाउस' लॉजमध्ये वेश्या व्यवसाय सुरू असल्याची खात्रीशीर माहिती श्रीरामपूरचे अप्पर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाघचौरे यांच्या पथकाला मिळाली होती. या माहितीच्या आधारे अप्पर पोलीस अधीक्षकांच्या मार्गदर्शनाखाली अकोले पोलीस निरीक्षक मोहन बोरसे यांच्या पथकाने संयुक्तपणे छापा टाकला. या कारवाईदरम्यान लॉजमधून परराज्यातील दोन महिलांची सुटका करण्यात आली. तपासात लॉज मालक सुदेश सुखदेव मुर्तडक (वय ५०, रा. वीरगाव ता. अकोले) हा आर्थिक फायद्यासाठी संबंधित महिलांना वेश्या व्यवसाय करण्यास भाग पाडत असल्याचे उघड झाले. याप्रकरणी त्याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ही कारवाई पोलीस निरीक्षक मोहन बोरसे, पोलीस हेड कॉन्स्टेबल दादासाहेब लोखंडे, पोलीस नाईक संदीप दरंदले, पोलीस कॉन्स्टेबल अशोक गाडे, पोलीस कॉन्स्टेबल इंगळे, पोलीस कॉन्स्टेबल राहुल घोलप व अन्य पोलिसांच्या पथकाने केली. दरम्यान, अकोले शहरासह राजूर, कोतूळ आणि पर्यटनस्थळ भंडारदरा परिसरातील अनेक लॉजमध्ये अशा प्रकारचे अवैध धंदे सुरू असल्याची चर्चा असून, या प्रकारांवर कठोर कारवाई करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.




ठाणे महानगरपालिकेकडून पाणीपट्टीच्या थकीत रकमेवरील व्याज/ दंड / प्रशासकीय आकारामध्ये 100 टक्के सुट/ सवलत देणे सुरू असून पाणीपट्टीवरील थकबाकी वसुली मोहिम तीव्र करण्यात आली आहे. दिनांक 1 मार्च ते 16 मार्च 2026 या 16 दिवसांत पाणीपुरवठा विभागामार्फत एकूण 14 कोटी 88लाख 2 हजार 133 रुपये इतकी वसुली करण्यात आली आहे. थकीत पाणीपट्टीवर देण्यात आलेली सवलत 31 मार्च 2026 पर्यत सुरू असून जे नागरिक आपली पाणीपट्टी भरणार नाहीत अशा थकबाकीदारांवर 1 एप्रिल2026 पासून कारवाईची मोहिम अधिक प्रभावीपणे केली जाणार आहे.

## थोडक्यात बातम्या...



### भा.ज.पा. व्यापारी आघाडीच्यावतीने नवनिर्वाचित नगरसेवकांचा सत्कार

अहिल्यानगर (स. गांवकरी) : भारतीय जनता पार्टी व्यापारी आघाडीच्या वतीने नवनिर्वाचित नगरसेवकांचा सत्कार करण्यात आला. यावेळी भाजपाचे उपाध्यक्ष गोपाळ वर्मा यांचा केलेल्या कार्याबद्दल खास सन्मान स्थायी समितीचे सभापती सुभाष लोंढे यांच्या हस्ते करण्यात आला. समवेत नगरसेवक निखिल वारे, महेश लोंढे, गोरख पडोळे, संजय ढोणे व्यापारी आघाडीचे अध्यक्ष महेश गुगळे व कार्यकर्ते उपस्थित होते.

### घरकुल लाभार्थ्यांना ५ ब्रास रेती विनामूल्य देण्याचे आदेश



नांदेड जिल्हा (स. गांवकरी) : बिलोली तालुक्यातील शासकीय रेती घाटांमधून घरकुल योजनेच्या लाभार्थ्यांना विनामूल्य रेती उपलब्ध करून देण्याचे स्पष्ट निर्देश तहसीलदार बिलोली यांनी दिले आहेत. याबाबत गौण खनिज शाखेमार्फत संबंधित लिलावधारकास लेखी आदेश जारी करण्यात आला आहे. तहसील कार्यालय, बिलोली येथून निर्गमित आदेशानुसार, लातूर येथील लिलावधारक श्री. विजयकुमार सत्यनारायण अग्रोया यांना जिल्हाधिकारी नांदेड यांच्या १० जानेवारी २०२६ रोजीच्या आदेशाचा संदर्भ देत, घरकुल लाभार्थ्यांना जास्तीत जास्त ५ ब्रास रेती विनामूल्य देणे बंधनकारक करण्यात आले आहे. सदर आदेशात नमूद केल्यानुसार, संबंधित लाभार्थ्यांच्या मंजूर बांधकाम आराखड्यानुसारच रेती देण्यात येणार असून, कोणत्याही परिस्थितीत ५ ब्रासपेक्षा जास्त रेती दिली जाणार नाही. तसेच रेती थेट लाभार्थ्यांच्या वाहनामध्ये भरून देणे आवश्यक असून, वाहतूक खर्च लाभार्थ्यांनी स्वतः करायचा आहे. महत्वाचे म्हणजे, रेती देताना लाभार्थ्यांकडून कोणतीही रक्कम आकारली जाणार नाही, याची विशेष दक्षता घेण्याचेही आदेशात स्पष्ट करण्यात आले आहे.

### ठाण्यात एस टी अधिकाऱ्याची अपंग कर्मचाऱ्याला दुय्यम वागणुक

ठाणे (स. गांवकरी) : परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्या ठाणे शहरातील खोपट वर्कशॉपमध्ये काम करणाऱ्या अपंग कर्मचाऱ्यावर वरिष्ठ अधिकाऱ्याकडून होत असलेल्या दुय्यम वागणूकीबद्दल न्याय मिळणे बाबत अखेर कर्मचाऱ्याला नौपाडा पोलिसात तक्रार दाखल करावी लागली आहे. महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन सेवेत गेली ३३ वर्षपासून नोकरी करत असलेला गोरखनाथ जनार्दन पडवळ हा शिपाई काम करणारा कर्मचारी सध्या ठाणे आगार क्र. १ (खोपट, हंसनगर वर्कशॉप) येथे कार्यरत असून एक अपंग कर्मचारी असून कार्यस्थळी वारंवार अन्याय व गैरवर्तणूक वागणूक मिळत असल्याप्रकरणी आगार क्र. १ येथे सहायक वाहतूक निरीक्षक सचिन पवार वेळोवेळी अपशब्द व दुय्यम वागणूक देत असल्याने कंटाळून शिपाई गोरखनाथ यांनी महाराष्ट्र राज्य परिवहनच्या इतर वरिष्ठ अधिकाऱ्यांना लेखी तक्रार करूनही कोणतीही कारवाई होत नसल्याने अखेर शेवटी कंटाळून आज ठाण्यातील नौपाडा पोलिसांत तक्रार दाखल केली आहे.

# संत बुवाजी बुवा महाराज पायी दिंडी सोहळाचे पंढरपूरला प्रस्थान

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**



प्रति पंढरपूर समजल्या जाणाऱ्या श्रीक्षेत्र अरणगांव ते श्रीक्षेत्र पंढरपूर या श्री संत बुवाजी बुवा महाराज पायी दिंडी सोहळाचे प्रस्थान अरणगाव (मेहेराबाद)येथून दि २० मार्च रोजी होणार असून, पालखी सोहळा दि २९ मार्च ला चैत्र एकादशीला पंढरपूरला पोहचणार आहे तर ३० मार्चला परत येणार आहे ,श्री संत बुवाजी बुवा महाराज समाधी देवस्थान व समस्त ग्रामस्थ अरणगाव, ता.नगर यांच्या वतीने गेल्या २२ वर्षांपासून हा सोहळा आयोजित केला जातो. आषाडी एकादशीला अरणगावला उत्सव असतो व दुसऱ्या दिवशी पांडुरंग येथे द्वादशीला उपवास सोडायला येतात अशी आख्यायिका आहे.त्यामुळे येथील भाविक पंढरपूर आषाडी वारी करत नाही व कोणी पंढरपूरला जात नाही,पण वारी चुकली नाही पाहिजे म्हणूंन गेली २१ वर्ष हि पायी दिंडी चैत्र महिन्यात कडक उन्हाळ्यात निघते,त्यामध्ये सुमारे ४०० च्या वर वारकरी सहभागी होतात. श्री संत बुवाजी बुवा महाराज पायी पालखी सोहळा श्रीक्षेत्र अरणगांव ते श्रीक्षेत्र पंढरपूर हा १० दिवसाचा असून सद्गुरू बुवाजी बुवा महाराजांच्या कृपाशिर्वादाने व हनुमंत महाराज लोटके, दादाभाऊ महाराज लोटके यांच्या प्रेरणेने अरणगांव येथील बुवाजी बुवा मंदिर येथून दिंडी सोहळाचे प्रस्थान २० मार्चला सकाळी ८ वा होणार आहे,दिंडीत ध्वजकारी,भजनी मंडळ व डोकयावर तुळशी वृदावन घेऊन महिला सहभागी होतात.सध्याचे दिवस कडक उन्हाचे असल्याने पहाटे ४ ते सकाळी ९ व दुपारी ४ ते ७ पर्यंत वारकरी पायी चालतात. देणगीदारांची वतीने वारकऱ्यांची चहा,नाष्टा,रात्रीचे जेवण दुपारचे जेवण व मुक्कामाची व्यवस्था करण्यात आली होती,दररोज रात्री कीर्तन होणार आहे, वाळकी, रुईछत्तीशीला चापडगाव,टेंबुर्णी मार्गे दि २९ ला भैरवनाथ देवस्थान ट्रस्ट आश्रम, बार्शीरोड, श्रीक्षेत्र पंढरपूर येथे अध्यक्ष भानुदास कोतकर याच्या सौजन्याने दिंडीचा मुक्काम असून दि ३० मार्च ला काल्याचा महाप्रसाद व द्वादशीचा उपवास सोडून रात्री तेथून दिंडी अरणगाव कडे परत येणार आहे.

दिंडीचे नियोजन श्री संत बुवाजी बुवा देवस्थान, समस्त ग्रामस्थ,अरणगांव व पंचक्रोशी यांच्यासह देवस्थानचे विश्वस्त नवनाथ दशरथ गहिले,नानासाहेब यदु करांडे,सुजित बाबुराव कोके,राजु गोरख कोतकर,रामदास गंगाधर शिंदे,सागर रमेश आजबे, रावसाहेब डव्हारे, बाळुमामा शिंदे, अशोक लक्ष्मण जाधव,गोरख भगवंत शिंदे,अमोल लक्ष्मण आमले यांनी केले.

# वा साबेगावातील धोकादायक गतिरोधक तात्काळ हटवा

**ठाणे : (समर्थ गांवकरी)**



दिवा शहरातील दिवा स्टेशन ते साबेगांव रस्त्यावरील गतिरोधक सध्या वाहन चालक व नागरिकांच्या आरोग्यासाठी डोकेदुखी ठरत आहेत. सदर रस्त्यावरील सर्वच गतिरोधक हे तांत्रिक निकष डावलून आणि चुकीच्या पद्धतीने बांधण्यात आले असल्याने सदर गतिरोधक तोडून नवीन अधिकृत गतिरोधक बांधण्यासाठी शिवसेना नगरसेवक अँड आदेश भगत यांनी ठाणे महानगर पालिका आयुक्त आणि नगर अभियंता यांना लेखी निवेदन दिले आहे. मुंबई उच्च न्यायालयान केवल सेमलानी विरूध्द बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्त या प्रकरणात दिलेल्या निकालानुसार राज्यातील सर्व गतिरोधक हे 'इंडियन रोड्स कॉंग्रेस' च्या मार्गदर्शक तत्वानुसार असणे अनिवार्य आहेत. मात्र दिवा शहरात या नियमांचे सर्रास उल्लंघन होतना दिसत असल्याचे अँड आदेश भगत यांचे म्हणे आहे. नियमांनुसार गतिरोधकांची उंची १० सें.मी. आणि त्रिज्या १७ सें. मी. असावी लागते. परंतु दिवा स्टेशन ते साबे गाव रोड वरील गतिरोधक हे प्रमाणापेक्षा जास्त उंच आणि तीव्र आहेत. या चुकीच्या गतिरोधकांमुळे दुचाकी व चारचाकी वाहन चालकांना पाठीच्या कण्यांचे, मणक्याचे आणि मानदुखीचे गंभीर आजार जडत आहेत.

# धर्मांतरासाठी दबाव टाकल्याचा आरोप, युवका विरुद्ध गुन्हा




**इगतपुरी: (समर्थ गांवकरी)**

इगतपुरी येथे एका १९ वर्षीय युवतीवर अत्याचार करून तिला धर्मांतरासाठी दबाव टाकल्याचा गंभीर प्रकार उघडकीस आला आहे. याप्रकरणी पीडित युवतीच्या तक्रारीवरून एका संशयित युवकाविरुद्ध इगतपुरी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, संबंधित युवकाने गोड बोलून युवतीशी मैत्री निर्माण केली. स्वतःला बौद्ध समाजाचा असल्याचे खोटे सांगून तिची फसवणूक केल्याचा आरोप आहे. २३ मार्च २०२२ रोजी युवती अल्पवयीन असताना तिच्यावर जबरदस्तीने अत्याचार केल्याची तक्रार करण्यात आली आहे. तसेच, कपालेश्वर परिसरात तिला दोन वेळा जबरदस्तीने बोलावून घेतल्याचे आणि न आल्यास कुटुंबाला जीवे मारण्याची धमकी दिल्याचेही तक्रारीत नमूद आहे. आरोपीने वेळोवेळी तिच्यावर धर्मांतर करण्यासाठी दबाव टाकल्याचाही आरोप आहे. तसेच, तिच्या घरात घुसूनही दोन वेळा अत्याचार केल्याचे सांगितले आहे. या प्रकरणी पीडित युवतीने इगतपुरी पोलीस ठाण्यात फिर्याद दिल्यानंतर भारतीय न्याय संहिता कलम ६४ (२)(ड), ३२९ (२), ३५१ (२) तसेच बालकांचे लैंगिक अपराधांपासून संरक्षण अधिनियम २०१२ अंतर्गत कलम ४ व ६ नुसार संशयित आरोपी मुस्तफा शेख (रा. नाशिक) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांकडून या प्रकरणाचा पुढील तपास सुरू असून आरोपीचा शोध घेतला जात आहे.

# घनकचरा व पाणी व्यवस्थापनाबाबत जिल्हास्तरीय कार्यशाळा संपन्न

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**




जिल्हा परिषद पालघर व सेंटर फॉर वॉटर अँड सॅनिटेशन, सी.ई.पी.टी. युनिव्हर्सिटी तसेच एचडीएफसी बँकेच्या 'परिवर्तन' उपक्रमाच्या सहकार्याने पालघर व डहाणू तालुक्यातील निवड केलेल्या ३० ग्रामपंचायतींमध्ये घनकचरा व्यवस्थापन व पाणी व्यवस्थापन उपक्रम प्रभावीपणे राबविण्यात येत आहेत. या उपक्रमांची अंमलबजावणी अधिक सक्षम व परिणामकारक पद्धतीने करण्यासाठी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मनोज रानडे यांच्या मार्गदर्शनाखाली ११ मार्च २०२६ रोजी सरपंच व ग्रामपंचायत अधिकारी यांचे जिल्हास्तरीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेस अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी रविंद्र शिंदे, पालघर पंचायत समितीचे गटविकास अधिकारी संजय भोये, जिल्हा पाणी व स्वच्छता कक्षाचे लेखाधिकारी पांडुरंग कोरडे, सेंटर फॉर वॉटर अँड सॅनिटेशन, सी.ई.पी.टी. युनिव्हर्सिटीचे ध्रुव भावसार, केंद्राचे प्रमुख असीम मन्सूरी, उपासना यादव तसेच जिल्हा पाणी व स्वच्छता विभागाचे जिल्हा व तालुकास्तरीय कर्मचारी उपस्थित होते. "आपले गाव स्वच्छ आणि सुंदर ठेवण्यासाठी गाव पातळीवर उभारण्यात आलेल्या स्वच्छता सुविधांचे नियमितपणे संचालन व देखभाल ग्रामपंचायतींनी जबाबदारीने करणे अत्यंत आवश्यक आहे," असे प्रतिपादन जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी रविंद्र शिंदे यांनी यावेळी केले. यावेळी ग्रामीण भागासाठी घनकचरा व्यवस्थापनाबाबत तसेच पाऊस पाणी संकलनाबाबत मार्गदर्शक पुस्तिकेचे प्रकाशन करण्यात आले.

या कार्यशाळेमध्ये ग्रामपंचायतींना आदर्श बनविण्यासाठी केंद्र व राज्य शासनाच्या विविध महत्वाकांक्षी योजनांचे अभिसरण करून विकास साधण्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. यामध्ये जल जीवन मिशन, स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण), प्रधानमंत्री आवास योजना (PMAY), विकसित भारत अभियान, रोजगार हमी योजना, आजीविका अभियान (ग्रामीण), माझी वसुंधरा अभियान तसेच मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान या योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीद्वारे ग्रामपंचायती समृद्ध करण्यावर भर देण्यात आला.

कार्यशाळेत घनकचरा व्यवस्थापन, पाणी व्यवस्थापन, स्वच्छता सुविधा टिकवून ठेवणे तसेच ग्रामपंचायतींच्या विकासासाठी विविध योजनांचे समन्वयाने नियोजन कसे करावे याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. तसेच सहभागी सरपंच व ग्रामपंचायत अधिकाऱ्यांनीही आपले अनुभव व सूचना मांडल्या.

यावेळी पाणी व स्वच्छता विभागाचे तालुकास्तरीय तसेच जिल्हास्तरीय अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते.

# नांदेड जिल्हा परिषदेच्या २३ कोटी २६ लक्ष रुपयांच्या अर्थसंकल्पास मंजूरी



## सक्षम महिला, आधुनिक शेती, शिक्षण व आरोग्यातून गावांचा सर्वांगीण विकास

**नांदेड जिल्हा: (समर्थ गांवकरी)**



नांदेड जिल्हा परिषदेचा अर्थसंकल्प आज सादर करण्यात आला. जिल्हा परिषदेच्या स्वः उत्पन्नातून तयार करण्यात आलेल्या सन 2025-26 च्या सुधारित व सन 2026-27 च्या मूळ अर्थसंकल्पास जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक मेघना कावली यांनी मान्यता दिली. यशवंतराव चव्हाण सभागृहात झालेल्या बैठकीत हा अर्थसंकल्प मंजूर करण्यात आला.

मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक मेघना कावली यांनी हा अर्थसंकल्प सादर केला. यावेळी मंचावर अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप माळोदे, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक डॉ. संजय तुबाकले, सामान्य प्रशासन विभागाचे उप मुख्य कार्यकारी अधिकारी राजकुमार मुक्कावार, मुख्य लेखा व वित्त अधिकारी शिवप्रकाश चन्ना, उपमुख्य लेखा व वित्त अधिकारी महेश देशमुख, लेखाधिकारी विशाल हिवरे यांची उपस्थिती होती.

अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकात शिक्षण विभागासाठी 1 कोटी 16 लक्ष रुपयांची तरतूद करण्यात आली असून खेळाचे मैदान विकसीत करणे व क्रिडा साहित्य पुरविण्यासाठी 25 लाख रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. करिअर मार्गदर्शन व अकरावी-बारावीतील प्रज्ञावंत विद्यार्थ्यांना अर्थसहाय्य करण्यासाठी प्रज्ञा प्रकल्प राबविण्यात येणार असून यासाठी 32 लक्ष रू. ची तरतूद करण्यात आली आहे.

माळेगावसह इतर यात्रेसाठी 75 लाख रुपयाची तरतूद आहे. ग्रामीण भागात होणारे श्वानदंश व साप चावून होणारे मृत्यु रोखण्यासाठी आवश्यक इंजेक्शनासाठी 20 लक्ष, प्राथमिक आरोय केंद्रातील अत्याधुनिक प्रसूती कक्षा साठी 20 लक्ष रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. या शिवाय आरोग्य केंद्र NQAS करणे, आरोग्य दूत योजना राबविणे, क्षयरोग मूक्त गाव अशा वैशिष्टपूर्ण योजना राबविणे करिता एकूण 45 लक्ष रू. ची तरतूद करण्यात आली आहे.

अनुसूचित जाती-जमाती व दुर्बल घटकांसाठी 1 कोटी 56 लक्ष रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. यामध्ये व्यवसायासाठी आर्थिक सहाय्य, चारचाकी वाहन खरेदीसाठी अनुदान, विद्यार्थ्यांना लॅपटॉपसाठी मदत तसेच गर्भवती माता व बालकांच्या सुरक्षेसाठी अ‍ॅनोमली स्कॅनसाठी 40 लक्ष रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. दिव्यांगांसाठीही 1 कोटी 16 लक्ष रुपयांचा निधी राखीव ठेवण्यात आला आहे.

शेती क्षेत्रात ड्रोन खरेदीसाठी 12 लक्ष रुपये, जैविक कीटकनाशक प्रयोगशाळेसाठी 12 लक्ष, सूक्ष्म प्रक्रिया उद्योगांसाठी 16 लक्ष रुपये तसेच आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबांना 18 लक्ष रुपयांची मदत देण्यात येणार आहे. प्रिसीजन फार्मिंग योजनेसाठी 11 लक्ष रुपयांची तरतूद आहे. पशुधन विभागाकरिता 90 लक्ष रुपये तरतूद ठेवण्यात आली आहे. यामध्ये औषधी, ईमारत दुरुस्ती, लस वाहतुक याचा समावेश आहे. लघु पाटबंधारे विभागासाठी 45 लक्ष तरतूद करण्यात आली आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, अ‍ॅड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ४०६, व्यंकटेश विश्व, अभिरूची परिसर समोर, पारे कंपनी रोड, नऱ्हे, पुणे – ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : A-1, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)

# आनंदी बाजारामुळे विद्यार्थ्यांना व्यवहारी ज्ञान

पारनेर : (समर्थ गांवकरी)

निघोज येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेने आनंदी बाजारच्या माध्यमातून विद्यार्थ्यांसाठी एक व्यवहारी ज्ञान उपलब्ध करून देऊन एक चांगला सामान्य ज्ञानाला पोषक वातावरण निर्मिती करीत स्पर्धा परीक्षेसाठी विद्यार्थी कसे तयार होतील असे खात्रीशीर शिक्षण जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतून मिळत असल्याचे खरे समाधान पालकांना आहे. जिल्हा परिषद प्राथमिक शाळा ही आपली मातृ आणी पितृ संस्था असल्याचे गौरवोद्गार युपीएससी परीक्षेत देशात ६८७ रँकने यशस्वी झालेले अल्पेश अरुणा भाऊसाहेब ढवळे यांनी व्यक्त केले आहे. निघोज येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या वतीने मंगळवार दि.१७ रोजी सकाळी नऊ ते दुपारी एक वाजेपर्यंत आनंदी बाजारचे आयोजन करण्यात आले होते. या आनंदी



बाजारचे उद्घाटन ढवळे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी ते बोलत होते. पारनेर तालुका पत्रकार संघाचे कार्याध्यक्ष तथा ज्येष्ठ मार्गदर्शक दत्ताजी उनवणे या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. यावेळी केंद्र प्रमुख बाचकर सर, सेवानिवृत्त मुख्याध्यापक कैलास शिंदे, मुख्याध्यापक गणपतराव देठे, ज्येष्ठ शिक्षक शिंदे सर, ज्येष्ठ शिक्षीका लंके मॅडम, शिक्षीका लाळगे मॅडम, उपसरपंच ज्ञानेश्वर वरखडे, वडनेर गावचे माजी सरपंच शिवाशेठ पवार, शिरुर तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष संजय बारहाते, पसायदान सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष रामचंद्र महाराज सुपेकर, युवा नेते राहुल पांढरकर, पारनेर तालुका मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष बाबाजी वाघमारे, उपाध्यक्ष भास्करराव कवाद, पत्रकार संघाचे पदाधिकारी आनंद भुकन, पत्रकार सागर आतकर, अल्पसंख्याक समाजाचे नेते अस्लमभाई इनामदार, युवा नेते देवीदास पवार, ग्रामपंचायत सदस्या शबनूर इनामदार, ग्रामपंचायत सदस्या भावना साळवे. अरुणाताई ढवळे, विठ्ठलराव ढवळे, पत्रकार मंगेश थोरात, स्वरांजली केक्स या गृहऊद्योगाच्या अध्यक्षा सरला उनवणे, रुपाली ससाणे आदी मान्यवर तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. ढवळे यावेळी म्हणाले गेली वीस वर्षापूर्वीची शिक्षण पद्धती व आजची शिक्षणपद्धती यामध्ये आमूलाग्र बदल झाला असला तरी दिवसेंदिवस जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील शैक्षणिक दर्जा उंचावत असून आपला याच जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या माध्यमातून शैक्षणिक विकास झाला असून आपण जिल्हा परिषद शाळेला कधीच विसरणार नाही एवढे मोठे योगदान गुरुजनांनी आपल्या साठी दिले असून केंद्र प्रमुख बाचकर सर, जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक देठे सर, ज्येष्ठ शिक्षक शिंदे सर, ज्येष्ठ शिक्षिका लंके मॅडम,शिक्षीका लाळगे मॅडम यांनी या शाळेचा पट वाढवून या ठिकाणी खऱ्या अर्थाने शैक्षणिक संस्कृतीला पाठबळ दिले असून जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे भवितव्य उज्ज्वल असल्याचे प्रतिपादन ढवळे सर यांनी व्यक्त केले आहे. पसायदान सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष तथा ज्येष्ठ मार्गदर्शक व सामाजिक कार्यकर्ते रामचंद्र महाराज सुपेकर यावेळी म्हणाले अल्पेश ढवळे यांनी युपीएससी परीक्षेत यशस्वीपणे उत्तीर्ण होऊन देशात नावलौकिक मिळवला आहे. ढवळे हे निघोज व परिसरातील पहिलेच विद्यार्थी आहेत की ज्यांनी जिल्हाधिकारी पदाला गवसणी घातली आहे. जिल्हा परिषद प्राथमिक शाळा व माध्यमिक शाळांचा शैक्षणिक दर्जा सातत्याने उंचावत आहे.

## काँक्रीटीकरणाचे काम निकृष्ट; आंदोलनाचा इशारा

पारनेर : (समर्थ गांवकरी)

नगर-कल्याण राष्ट्रीय महामार्गावरील काँक्रीटीकरणाचे काम निकृष्ट दर्जाचे असल्याचा गंभीर आरोप राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते व निलेश लंके प्रतिष्ठानचे तालुका उपाध्यक्ष रवींद्र राजदेव यांनी केला आहे. सावरगाव-काळेवाडी परिसरात रस्त्यावर चिरा पडलेले दिसत असून, काँक्रिट टाकल्यानंतर पुरेसे पाणी पुरवठा न केल्याने कामाचा दर्जा खालावत असल्याचा त्यांचा दावा आहे. रवींद्र राजदेव यांनी सांगितले की, कामादरम्यान ट्रॅफिक नियंत्रणासाठी कोणत्याही गार्डरेल्स, सुरक्षा व्यवस्था किंवा सूचना फलक लावण्यात आलेले नाहीत. यामुळे अपघातांचा धोका प्रचंड वाढला आहे. निष्काळजीपणामुळे काळेवाडी येथे झालेल्या अपघातात एका युवकाचा मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. स्थानिक ग्रामस्थांनी याबाबत तीव्र



नाराजी व्यक्त केली आहे. रवींद्र राजदेव यांनी स्पष्ट इशारा दिला की, रस्त्याच्या काँक्रीटीकरणातील त्रुटी तातडीने दूर करून दर्जा सुधारला नाही तर निलेश लंके प्रतिष्ठानच्या वतीने तीव्र आंदोलन करण्यात येईल. तसेच, काम करणाऱ्या कंपनीविरुद्ध वरिष्ठ पातळीवर तक्रार दाखल करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. पुढील काळात शासनाने दुर्लक्ष केल्यास कंपनीविरुद्ध न्यायालयीन कारवाई करण्याचा इशाराही त्यांनी दिला आहे. या प्रसंगी सावरगाव, काळेवाडी, मानेवाडी, नांदूर पठार येथील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. स्थानिकांनी विकासाच्या नावाखाली सुरक्षा व दर्जाकडे दुर्लक्ष न करण्याची मागणी केली. शासनाने तातडीने दखल घेऊन कामाची गुणवत्ता तपासावी, अन्यथा आंदोलन अपरिहार्य असल्याचे संकेत दिले आहेत. शासनाने या महामार्गासाठी केंद्र व राज्य सरकारकडून हजारो कोटी रुपयांचा निधी मंजूर केला आहे.

मात्र, काम सुरू असताना कोणताही नॅशनल हायवे अधिकारी देखरेख करताना दिसत नाही. ठेकेदार शिकव इंजिनियर्स उभे करून काम करत असून, कोणताही क्वालिटी कंट्रोल पाहिला जात नाही, असे निदर्शनास आले आहे. ग्रामस्थांनी प्रशासनाने त्वरित लक्ष घालावे अशी मागणी केली आहे.

## माजी महापौर अभिषेक कळमकर अटकेच्या मागणीसाठी पीडितेचा आक्रोश; आत्मदहनाचा इशारा

अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)

माजी महापौर अभिषेक कळमकर याला तात्काळ अटक करण्यात यावी, अशी मागणी पीडित महिलेने जिल्हा पोलीस अधीक्षकांकडे निवेदनाद्वारे केली आहे. तसेच, आरोपीला लवकरात लवकर अटक न झाल्यास येत्या २५ मार्च रोजी पोलीस अधीक्षक कार्यालयासमोर आत्मदहन करण्याचा इशाराही संबंधित महिलेने दिला आहे. पीडितेने दिलेल्या निवेदनात म्हंटले आहे की, एम.आय.डी.सी. पोलीस ठाण्यात दि. २१ फेब्रुवारी २०२६ रोजी अभिषेक कळमकर याच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम 64 (1), 64 (2) (M), 69 (2) तसेच माहिती तंत्रज्ञान अधिनियम 66 (E) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला होता. या तक्रारीत आरोपीने एम.आय. डी.सी. परिसर, विळद घाट तसेच




शिरूर येथे अत्याचार केल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. तसेच, आरोपीने पीडितेला व तिच्या कुटुंबियांना जिवे मारण्याची धमकी देत तिचे अश्लील व्हिडिओ तयार केले आणि व्हिडिओ कॉलद्वारे धमकावून अश्लील कृत्य करण्यास भाग पाडल्याचेही तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. या प्रकरणाचा तपास तोफखाना पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला असून पोलीस निरीक्षक भांबळ यांच्या मार्गदर्शनाखाली तपास सुरू आहे. दरम्यान, गुन्हा दाखल होऊन जवळपास एक महिना उलटूनही आरोपी अद्याप अटकेत नसल्याने पीडित महिला व तिचे कुटुंब भयभीत अवस्थेत जीवन जगत आहेत. आरोपी फरार असल्याची माहिती माध्यमांतून समजत असल्याचे सांगत पीडितेने आपली भीती व्यक्त केली आहे. "जर आरोपी पोलीसांच्या ताब्यात नसेल, तर तो किंवा त्याचे सहकारी आमच्यावर कुठलाही घात करू शकतात," अशी भीती तिने व्यक्त केली. या पार्श्वभूमीवर पीडित महिलेने पोलीस प्रशासनाकडे विनंती करत, आरोपीला तात्काळ अटक करून तिला व तिच्या कुटुंबाला संरक्षण देण्याची मागणी केली आहे. अन्यथा, २५ मार्च रोजी आत्मदहन करण्याचा इशारा देत, त्यानंतर घडणाऱ्या कोणत्याही घटनेसाठी पोलीस प्रशासनाला जबाबदार धरण्यात येईल, असेही निवेदनात स्पष्ट करण्यात आले आहे.

## दोन गटांत हाणामारी; सात जण जखमी

अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)

शहरालगतच्या दरेवाडी (ता. अहिल्यानगर) येथील बडेकर वस्ती भागात जागेच्या वादातून दोन गटांत झालेल्या हाणामारीत सात जण जखमी झाले आहेत. या प्रकरणी परस्परविरोधी फिर्यादींवरून भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात दोन्ही गटांतील १९ जणांविरूध्द गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. दरेवाडी परिसरातील बडेकर वस्ती येथे जागेच्या मालकीवरून दोन गटांत काही दिवसांपासून वाद सुरू होता. हा वाद गेल्या गुरूवारी (दि.१२) रात्री १० वाजण्याच्या सुमारास विकोपाला गेला. यावेळी दोन्ही गटातील काही जण एकमेकांसमोर येत शिवीगाळ व दमदाटी करू लागले. त्यानंतर वादाचे रूपांतर हाणामारीत झाले.

## मौजे श्री क्षेत्र कोहंडी येथे अखंड हरिनाम सप्ताहाची भक्तीमय सांगता; दिंडी-पालखी सोहळ्याने गाव दुमदुमले!

राजूर : (समर्थ गांवकरी)

अकोले तालुक्यातील मौजे श्री क्षेत्र कोहंडी (हनुमान मंदिर) येथे अखंड हरिनाम सप्ताहाची सांगता अत्यंत भक्तीमय वातावरणात दिंडी तसेच पालखी सोहळ्याने करण्यात आली. विठ्ठल नामाच्या गजराने संपूर्ण परिसर दुमदुमून गेला असून वारकरी टाळ, मृदुंग, लेझीम तसेच फुगडी नृत्यावर तल्लीन झाले होते.

"संतांच्या पाया हा माझा विश्वास, सर्व भावे दास झालो त्यांचा..." या अभंगाच्या ओळीप्रमाणे सप्ताहभर चाललेल्या या कार्यक्रमाची सांगता मोठ्या उत्साहात झाली. यावेळी ह.भ.प. माधव महाराज दुभाषे (औचीतवाडी घोडी) यांचे सुश्राव्य काल्याचे कीर्तन संपन्न झाले. त्यांनी काल्याचे महत्त्व स्पष्ट करत भगवान श्रीकृष्णाच्या गोकुळातील बाललीला, भक्ती,



प्रेम आणि आनंदाचा संदेश अत्यंत प्रभावीपणे मांडला. श्री कृष्णाच्या लोणी चोरी, माता यशोदे सोबतचे प्रेमळ नाते तसेच पूतना, बकासुर यांसारख्या असुरांचा संहार या लीलांचे वर्णन करत त्यांनी उपस्थित भाविकांना मंत्रमुग्ध केले. त्यांच्या कीर्तनातून भक्तीमय वातावरण अधिकच रंगले.

सांगता मिरवणुकीत कोहंडी ग्रामस्थांनी दिंडी व पालखी सोहळ्याचे भव्य आयोजन केले होते. सह्याद्रीच्या पंचक्रोशीतील भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून विठ्ठल नामाचा गजर केला. "राधाकृष्ण गोपाल कृष्ण" या अभंगावर वारकरी देहभान विसरून नाचत होते. यावेळी टाळ-मृदुंगाच्या तालावर लेझीम व फुगडी खेळत भक्तगणांनी भक्तीचा आनंद लुटला. संपूर्ण कोहंडी परिसर हरिनामाच्या गजराने दुमदुमून गेला होता. सोहळ्यानंतर सर्व भाविकांसाठी महापंगत व महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे उत्कृष्ट नियोजन समस्त ग्रामस्थ, भजनी मंडळ, तरुण मित्र मंडळ, महिला भगिनी, म्हसोबा तरुण मित्र मंडळ कोहंडी व ठाकरवाडी आदींनी केले.

## जागतिक ग्राहक दिन गॅस नगरपंचायत, पुरवठा विभाग व बिबट्या च्या प्रश्नावर गाजला

अकोले : (समर्थ गांवकरी)

जागतिक ग्राहक दिनाच्या कार्यक्रमात गॅस वितरण तसेच संगमनेर चे पुरवठादार यांचे वर नाराजी नगरपंचायत च्या बाजारतळ कारभार, पुरवठा विभागाच्या रेशन मिळणे, बिबट्या, वीज संदर्भात नागरिकांनी लेखी प्रश्नावर गाजला आहे. अकोले येथील तहसील कार्यालय व महाराष्ट्र ग्राहक पंचायत अकोले शाखेच्या जागतिक ग्राहक दिनानिमित्त ग्राहक मेळाव्याचे आयोजन करण्यात आले या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी तहसीलदार डॉ. सिद्धार्थ मोरे हे होते. यावेळी ग्राहक पंचायतीचे जिल्हा उपाध्यक्ष मच्छिंद्र मंडलिक, कार्याध्यक्ष महेश नवले, नायब तहसीलदार प्रमोद सावंत, पोलिस निरीक्षक बोरसे, वीज अभियंता नामदेव शेळके, विठ्ठल सोनवणे, पुरवठा निरीक्षण संदीप निळे आदी उपस्थित होते. यावेळी मच्छिंद्र मंडलिक यांनी संगमनेर येथील गॅस वितरकांनी अकोले तालुक्यात



कार्यालय काढून घरपोच सेवा देण्याचे आदेश असतानाही ते करत नाही त्यामुळे त्यांच्यावर जीवनावश्यक वस्तू कायदा 1955मधील तरतुदी नुसार व एल पी जी वितरण अधिनियम 2000 मधील तरतुदी चे उल्लंघन व भंग केल्यामुळे त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्यात यावी अशी मागणी केली. तसेच अकोले नगर पंचायत वार्ड क्रमांक एक मध्ये रात्री अपरात्री पाणी पुरवठा करते तेही कमी दाबाने त्यामुळे नागरिकांना मनस्ताप सहन करावा लागतो त्यामुळे वेळेत व नियमित पाणी पुरवठा करावा अशी मागणी केली. 32 गाव पाणीपुरवठा योजनेत मोठा भ्रष्टाचार झाला असून अजूनही ती कार्यान्वित झाली नाही यातील अधिकारी व ठेकेदारावर यांचेवर कारवाई करावी. महेश नवले यांनी फॉरेस्ट च्या वर्ग दोनच्या जमिनी बाबद व बस स्थानक अतिक्रमण व पार्किंग संदर्भात प्रश्न मांडले, बिबट्याचा प्रश्न निर्माण झाला असून त्यांचा बंदोबस्त करावा अशी मागणी केली.भाऊसाहेब वाकचौरे यांनी मुख्यमंत्री शेत पाणंद रस्ते मोजणीसाठी निवड झालेल्या गावांच्या रस्त्यांची मोजणी तातडीने पूर्ण करण्यात यावी, शेतीला दिवसा वीज पुरवठा करावा, रात्रीच्या वेळेत कमीत कमी एक तास दिवसा वीजपुरवठा व्हावा अशी मागणी केली. प्रदिप हासे यांनी हिवरगाव पावसा टोल नाक्यावर अकोले तालुक्यातील वाहनां ना सूट मिळावी व बसस्थानकात पे अँड पार्क सुरू करावे अशी मागणी केली.

यावेळी मुतखेल येथील वेणूबाई महादू भांगरे यांनी संजय गांधी निराधार योजना संदर्भात प्रश्न उपस्थित केले.

यावेळी वनविभाग राजूर दत्तात्रय पडवळ, अकोले चे आनंदा पाटील, दिलीप जिरे, दुय्यम निबंधक अतुल कदम, वैद्य मापन निरीक्षक संगमनेर प्रशांत गडाख, अ. का. आहेर, एस टी विभाग चे सचिन वाकचौरे, दिलीप जिरे, नगरपंचायत चे योगेश सुकटे आदी उपस्थित होते.

## हॉस्टेलमधून बेपत्ता झालेल्या मुलींचा सुखद मिलाप

डांग गुजरात : (समर्थ गांवकरी)

डांग जिल्ह्यातील सापुतारा पोलीस ठाण्याच्या पी.आय. पी. डी. गोंडल्या यांच्या पथकाने राबवलेल्या 'ऑपरेशन मिलाप' अंतर्गत हॉस्टेलमधून बेपत्ता झालेल्या दोन अल्पवयीन मुलींना अवघ्या काही तासांत शोधून काढत त्यांच्या कुटुंबीयांशी सुखरूप मिलाप घडवून आणला. सापुतारा पोलीस स्टेशन हद्दीतील एका हॉस्टेलमध्ये इयत्ता ९ वीमध्ये शिकणाऱ्या दोन मुली कोणालाही न सांगता बाहेर पडल्या होत्या. याबाबत हॉस्टेलच्या गृहपालकांनी पोलीस ठाण्यात तक्रार नोंदवली होती. नातेवाईक व जवळच्या गावांमध्ये शोध घेऊनही मुलींचा काहीच मागमूस लागला नव्हता. घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन सापुतारा पोलिसांनी तात्काळ वेगवेगळ्या पथकांची स्थापना केली.

## आढळगावचे सरपंच शिवप्रसाद उबाळे यांची राज्यस्तरीय आदर्श सरपंच पुरस्कारासाठी निवड

श्रीगोंदा : (समर्थ गांवकरी)

श्रीगोंदा तालुक्यातील आढळगावचे कर्तृत्ववान व विकासाभिमुख सरपंच शिवप्रसाद उबाळे यांची "मान कर्तृत्वाचा... सन्मान नेतृत्वाचा" या राज्यस्तरीय सन्मान सोहळा २०२६ अंतर्गत राज्यस्तरीय आदर्श सरपंच पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे. त्यांच्या ठोस नेतृत्वशैलीमुळे आणि गावाच्या सातत्यपूर्ण सर्वांगीण विकासासाठी घेतलेल्या प्रभावी उपक्रमांमुळे त्यांना हा मान बहाल करण्यात येत आहे. सरपंच सेवा संघ, महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने दरवर्षी विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना हा प्रतिष्ठेचा सन्मान दिला जातो. सरपंच शिवप्रसाद उबाळे यांनी आपल्या कार्यकाळात आढळगावच्या विकासासाठी विविध योजनांची प्रभावी अंमलबजावणी करत



गावाचा चेहरामोहरा बदलण्याचा प्रयत्न केला आहे. पायाभूत सुविधा, स्वच्छता, पाणीपुरवठा तसेच सामाजिक उपक्रमांमध्ये त्यांनी प्रभावी नेतृत्व करत ग्रामविकासाला गती दिली आहे. गावाच्या प्रश्नांसाठी त्यांनी वेळोवेळी आंदोलनाचा मार्ग स्वीकारत प्रशासनाचे लक्ष वेधले. विकासकामे मार्गी लावण्यासाठी शासन दरबारी सातत्याने पाठपुरावा करून विविध प्रस्ताव मंजूर करून घेण्यात त्यांचे योगदान लक्षणीय राहिले आहे. त्यामुळे ते केवळ सरपंच म्हणून नव्हे, तर गावाच्या हक्कासाठी लढणारे कणखर नेतृत्व म्हणून ओळखले जातात.

हा राज्यस्तरीय सन्मान सोहळा रविवार, दि. ०५ एप्रिल २०२६ रोजी सकाळी ११ वाजता माऊली संकुल सभागृह, सावेडी रोड, अहिल्यानगर येथे संपन्न होणार आहे. या कार्यक्रमाला सरपंच सेवा संघाचे संस्थापक बाबासाहेब पावसे पाटील यांच्या नेतृत्वाखाली शिर्डी लोकसभा मतदारसंघाचे खासदार सदाशिव लोखंडे, आदर्श सरपंच भास्करराव पेरे पाटील, ग्रामसेवक संघटनेचे नेते एकनाथराव ढाकणे, यादवराव पावसे, रोहित पवार आदी मान्यवरांची उपस्थिती लाभणार आहे. सरपंच शिवप्रसाद उबाळे यांच्या या निवडीमुळे आढळगावसह संपूर्ण श्रीगोंदा तालुक्याच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला गेला असून सर्व स्तरांतून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## १९७६ च्या बॅचचा स्नेहसंमेलन मेळावा २१ मार्च रोजी

श्रीगोंदा : (समर्थ गांवकरी)

१९७६ च्या बॅचमधील सर्व मित्र-मैत्रिणींना कळविण्यात येते की, दि. १२ मार्च २०२६ रोजी झालेल्या कोअर कमिटीच्या बैठकीत चर्चा करून स्नेहसंमेलन मेळावा आयोजित करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या मेळाव्यास सर्वांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे. कार्यक्रमाचे स्वरूप पुढीलप्रमाणे आहे : दि. २१ मार्च २०२६ (शनिवार) रोजी सकाळी ९.३० वाजता ए स्टार हॉटेल येथे कार्यक्रमास सुरुवात होणार आहे. सकाळी ९.३० ते १०.३० : नोंदणी, चहा व नाश्ता सकाळी १०.३० ते ११.३० : महादजी शिंदे विद्यालय येथे गुरुजनांचा सत्कार, ग्रुप फोटो व त्यानंतर पुन्हा ए स्टार हॉटेल येथे आगमन दुपारी १२.०० ते २.०० : प्रस्ताविक, श्रद्धांजली व मनोगत दुपारी २.०० ते २.४५ : स्वादिष्ट भोजन दुपारी २.४५ ते ३.४५ : गप्पा-टप्पा, मनोरंजन, हास्य-विनोद



सायं. ४.०० : चहा/ कॉफी, पुढील भेटीचे नियोजन व समारोप या मेळाव्यासाठी आर्थिक योगदान ऐच्छिक असून, इच्छुकांनी आपली रक्कम श्री. शशिकांत आंधळकर यांच्याकडे जमा करावी, असेही कळविण्यात आले आहे. कोअर कमिटी बैठकीस सतीश बोरा, पांडुरंग खेतमाळीस, शशिकांत आंधळकर, रामदास घोडेकर, भास्कर नरके, दत्तात्रय शिंदे, सुनील गांधी व दीपक घोडके हे मान्यवर उपस्थित होते.

## वाघोलीत १८ ते २२ मार्च दरम्यान ६८वी महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धा

### ५० हजार प्रेक्षक क्षमतेचे भव्य क्रीडांगण सज्ज

- १८ मार्चला सुनेत्रा पवार यांच्या हस्ते उद्घाटन
- २२ मार्चला मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस यांच्या हस्ते समारोप

पुणे: (समर्थ गांवकरी)

महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघाच्या मान्यतेने रामकृष्ण अण्णा सातव पाटील यांच्या वतीने आयोजित करण्यात येत असलेली ६८वी महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धा (२०२५-२६) येत्या १८ ते 22 मार्च दरम्यान वाघोली (पुणे) येथे सुरू होणार आहे. या स्पर्धेची रूपरेषा, नियोजन, बक्षिसांची माहिती तसेच विविध महत्त्वाच्या बाबींविषयी माहिती देण्यासाठी नुकतीच पत्रकार परिषद आयोजित करण्यात आली होती. यावेळी पुणे जिल्हा कुस्तीगीर संघाचे अध्यक्ष मेघराज कटके यांनी पत्रकारांशी संवाद साधला. मेघराज कटके यांनी सांगितले की, "महाराष्ट्र केसरी स्पर्धेसाठी उभारण्यात येत असलेल्या क्रीडांगणाचे सुमारे ९९ टक्के काम पूर्ण झाले असून अंतिम तयारी सुरू आहे. या क्रीडांगणात ४० ते ५० हजार प्रेक्षक बसू शकतील, अशी भव्य व्यवस्था करण्यात आली आहे. स्पर्धेसाठी अत्याधुनिक सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत".

स्पर्धेदरम्यान महिला प्रेक्षकांसाठी स्वतंत्र आणि प्रशस्त गॅलरी तयार करण्यात आली आहे. उद्घाटनाच्या दिवशी महिलांना



विशेष प्राधान्य देण्यात येणार असून त्यांच्या सोयीसाठी अतिरिक्त व्यवस्था करण्यात आली आहे.

१८ मार्च रोजी संध्याकाळी ६ वाजता या स्पर्धेचे उद्घाटन महाराष्ट्र राज्याच्या पहिल्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या हस्ते होणार आहे. तर २२ मार्च रोजी स्पर्धेचा समारोप मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस यांच्या हस्ते होणार असल्याची माहिती कटके यांनी दिली. नुकत्याच झालेल्या महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघाच्या बैठकीत वाईल्ड कार्ड प्रवेशाबाबत चर्चा करण्यात आली. यासाठी ३६ खेळाडूंचे अर्ज प्राप्त झाले होते, त्यापैकी १५ खेळाडूंची निवड करण्यात आली आहे. यात नामांकित कुस्तीपटू स्पर्धेत उतरणार आहेत. या स्पर्धेत राज्यातील ४२ संघांमधील सुमारे ८५० खेळाडू सहभागी होणार आहेत. खेळाडूंसाठी निवास, भोजन व इतर आवश्यक सोयींची उत्तम व्यवस्था करण्यात आली आहे.

स्पर्धेसाठी क्रीडांगणात दोन मातीचे आणि दोन मॅटचे असे एकूण चार आखाडे उभारण्यात आले आहेत. उन्हाच्या तीव्रतेचा विचार करून स्पर्धेचे वेळापत्रक निश्चित करण्यात आले असून सकाळी ७ ते ९ आणि संध्याकाळी ५ ते रात्री १० या वेळेत सामने खेळवले जाणार आहेत.

### ठळक मुद्दे

- १७ ते २२ मार्चदरम्यान स्पर्धा
- ५० हजार प्रेक्षक क्षमतेचे क्रीडांगण
- ४२ संघांचे सुमारे ८५० खेळाडू
- दोन मातीचे व दोन मॅटचे आखाडे
- महिलांसाठी स्वतंत्र गॅलरी व्यवस्था

# डुंबरवाडी येथे प्राणप्रतिष्ठा व कलशारोहण सोहळा भक्तिभावात संपन्न

- माळशेज पतसंस्थेच्या नवीन इमारतीचे उद्घाटनही उत्साहात!
- "भगवंताच्या कार्यात सहभागी झालो की प्रतिष्ठा आपोआप वाढते" – प.पू. जन्मेजय शरण जी महाराज
- "कर्मच खरे देव; सेवेतूनच ईश्वराची प्राप्ती" – समाजसेवक नानजी भाई ठक्कर
- "विश्वास आणि सेवाभावावर उभी राहिलेली माळशेज पतसंस्था अधिक विस्तारेल" – डॉ. विश्वासराव आरोटे



















**जुन्नर : (समर्थ गांवकरी)**

जुन्नर तालुक्यातील डुंबरवाडी येथे श्री स्वामी समर्थ भक्ती शक्ती मंदिरात श्री स्वामी समर्थ, विठ्ठल-रुक्मिणी माता व श्री गणेश यांच्या मूर्तींचा प्राणप्रतिष्ठा तसेच मंदिर कलशारोहण सोहळा सोमवार दि. १६ मार्च २०२६ रोजी अत्यंत भक्तिभावपूर्ण वातावरणात आणि मोठ्या उत्साहात पार पडला.

ह.भ.प. चंद्रकांत महाराज डुंबरे सेवा संस्थेच्या वतीने आयोजित या भव्य धार्मिक सोहळ्यास डुंबरवाडी तसेच परिसरातील भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली. सकाळपासूनच मंदिर परिसरात धार्मिक वातावरण निर्माण झाले होते. वेदमंत्रांच्या गजरात, पूजाअर्चा, अभिषेक, हवन-यज्ञ आदी धार्मिक विधी पार पडले. त्यानंतर संतांच्या सान्निध्यात मूर्तींची विधिवत प्राणप्रतिष्ठा करण्यात आली. या प्रसंगी उपस्थित संत-महंतांच्या आशीर्वचनांनी उपस्थित भाविक भारावून गेले. या सोहळ्यास प.पू. जन्मेजय शरणजी महाराज (अयोध्या), ह.भ.प. तुकाराम महाराज दुराफे, ह.भ.प. योगी केशव बाबा चौधरी, एन.के.टी. ट्रस्टचे अध्यक्ष नानजी शेठ ठक्कर ठाणावाला तसेच महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबई राज्य सरचिटणीस व दैनिक समर्थ गांवकरीचे संपादक डॉ. विश्वासराव आरोटे, सत्यशीलदादा शेरकर, सौ. आशाताई बुचके, जिल्हा परिषद सदस्य गुलाबशेठ पारखे, छायाताई तांबे, पंचायत समिती सदस्य प्रशांत भाऊ डुंबरे, गंगाराम डुंबरे, मोहितशेठ ढमाले, बाळासाहेब फुले, सुनिल हांडे, उपेंद्र डुंबरे, प्रवीण डुंबरे, अतुल गोरे, सरपंच शितल गोरे, उपसरपंच अजित डुंबरे, सामाजिक कार्यकर्ते ज्ञानेश्वर डुंबरे, बाळू सुखाजी डुंबरे, तसेच पत्रकार अजित पानसरे, कैलास बोडके, पत्रकार दादा रोकडे, भारत आस्वार, श्रीकांत सहाणे, तानाजी लामखडे आदी मान्यवरांची उपस्थिती लाभली. संतांच्या सान्निध्यामुळे संपूर्ण परिसर भक्तिमय आणि आध्यात्मिक उर्जेने भारावून गेला.

या प्रसंगी प.पू. जन्मेजय शरणजी महाराज (अयोध्या) व समाजसेवक नानजीभाई खिमजीभाई ठक्कर ठाणावाला यांची प्रमुख उपस्थिती होती. या दोन्ही मान्यवरांचा सत्कार महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबई राज्य सरचिटणीस व दैनिक समर्थ गांवकरीचे संपादक डॉ. विश्वासराव आरोटे यांच्या हस्ते मान्यवरांचा प्रभू श्रीराम मूर्ती, तुकाराम महाराज पगडी, शाल, श्रीफळ, पेढे तसेच खारीक-खोबऱ्याचा हार देऊन करण्यात आला, यावेळी तुकाराम महाराज गाथा मंदिर देवस्थान संस्थापक अध्यक्ष हरिभक्त परायण पांडुरंग महाराज घुले, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रदेश प्रसिद्धी प्रमुख नवनाथ जाधव, योगी केशव बाबा चौधरी, माळशेज नागरी पतसंस्थेचे संस्थापक अध्यक्ष हरिभक्त परायण चंद्रकांत महाराज डुंबरे, नयनाताई डुंबरे, नामवंत उद्योजक अतुल नवले उपस्थित होते.

प्राणप्रतिष्ठा व कलशारोहण सोहळ्यावेळी मार्गदर्शन करताना जन्मेजय शरण जी महाराज यांनी अत्यंत प्रभावी व प्रेरणादायी विचार मांडत भक्तांना कर्म, भक्ती आणि नम्रतेचा संदेश दिला.

ते म्हणाले की, "सियाराम, जय सियाराम... आजचा हा प्राणप्रतिष्ठा महामहोत्सव अत्यंत मंगलमय असून संत, भक्त आणि भगवंत यांचे मिलन हीच खरी ईश्वरी कृपा आहे." श्री स्वामी समर्थ, श्री विठ्ठल-रुक्मिणी माता व श्री गणेश यांच्या स्थापनेमुळे डुंबरवाडी परिसर पवित्र व आध्यात्मिक वातावरणाने भारावून गेला असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी त्यांनी त्रिदेव, वारकरी परंपरा आणि संत परंपरेचे महत्त्व अधोरेखित करत नामदेव महाराज यांच्या कीर्तन परंपरेचा उल्लेख केला. "काल कीर्तनातून वारकरी संप्रदायाचा दिव्य अनुभव मिळाला, तर आज देहू येथील पांडुरंग महाराजांच्या उपस्थितीने सोहळ्याची शोभा अधिक वाढली आहे," असे ते म्हणाले.

समाजातील प्रतिष्ठेच्या संकल्पनेवर भाष्य करताना त्यांनी सांगितले की, "आज प्रत्येकजण स्वतःची प्रतिष्ठा वाढवण्यासाठी धावत आहे. मात्र, जेव्हा आपण कुटुंबासह भगवंताच्या कार्यात सहभागी होतो, तेव्हा आपली प्रतिष्ठा आपोआप उंचावते." भगवान श्रीराम व हनुमान यांचा दाखला देत त्यांनी स्पष्ट केले की, "खरे कर्म करणारे कधीही नावासाठी काम करत नाहीत. हनुमानांनी श्रीरामांचे बहुतेक कार्य केले, पण त्यांना प्रसिद्धीची अपेक्षा नव्हती. हीच खरी सेवा आणि भक्ती आहे."

यावेळी त्यांनी नम्रता, सेवाभाव आणि कृतज्ञता यांचे महत्त्व अधोरेखित करत सांगितले की, "समाजासाठी आणि भगवंतासाठी केलेले कार्य कधीही व्यर्थ जात नाही. जो भगवंताच्या कार्यात स्वतःला अर्पण करतो, त्याचे जीवन आपोआप यशस्वी होते."

तसेच त्यांनी आयोजक चंद्रकांत महाराज डुंबरे व त्यांच्या परिवाराचे विशेष कौतुक करत, या भव्य सोहळ्याच्या यशस्वी आयोजनासाठी सर्व पदाधिकारी, संत, आचार्य व भाविकांचे आभार मानले. "श्री नानजीभाई ठक्कर यांच्या प्रेरणेने मला या पवित्र सोहळ्यात सहभागी होता आले, हे माझे भाग्य आहे," असेही त्यांनी नमूद केले.

शेवटी त्यांनी सर्वांना भक्ती, नम्रता आणि कर्मयोगाचा मार्ग स्वीकारण्याचे आवाहन करत, "भक्त, संत आणि भगवंत यांचे एकत्र येणे हीच खरी ईश्वरी कृपा असून, या मार्गावर चालल्यास जीवन धन्य होते," असा मोलाचा संदेश दिला.

माळशेज नागरी सहकारी पतसंस्थेच्या कार्यक्रमात बोलताना समाजसेवक नानजी भाई ठक्कर यांनी आपल्या प्रेरणादायी भाषणातून कर्म, सेवा आणि संस्कारांचे महत्त्व अधोरेखित केले.

ते म्हणाले की, "देव केवळ मंदिरात नसून तो आपल्या कर्मात दिसतो. प्रत्येकाने समाजासाठी काहीतरी देण्याची भावना ठेवली पाहिजे. सेवाभावातूनच खऱ्या अर्थाने ईश्वराची प्राप्ती होते." अयोध्येतील जानकी मंदिर, धर्मशाळा व विविध सेवाकार्यांचा उल्लेख करत त्यांनी हजारो लोकांना मोफत सुविधा देण्याचे कार्य सुरू असल्याचे सांगितले.

ठक्कर यांनी आरोग्य सेवेतही मोठे कार्य उभे केल्याचे सांगत, "बायपास, अँजिओग्राफी, किडनी ट्रान्सप्लांट सारख्या महागड्या उपचारांसाठी गरीबांना एक रुपयाही खर्च येऊ नये, यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत," असे स्पष्ट केले. तसेच प्राणीसेवेच्या माध्यमातून लाखो कुत्रे-मांजरे वाचवण्यात आल्याची माहितीही त्यांनी दिली. पुढील पिढी घडवताना शिक्षण व संस्कार यांना प्राधान्य देणे आवश्यक असल्याचे सांगत त्यांनी "सरस्वती आली की लक्ष्मी आपोआप येते," असा संदेश दिला. घर हे मंदिरासारखे असावे आणि महिलांचा सन्मान 'मातृदेवो भव' या भावनेने केला पाहिजे, असेही त्यांनी नमूद केले.

आपल्या भाषणाच्या शेवटी त्यांनी सर्वांना कर्मयोगाचा मार्ग स्वीकारण्याचे आवाहन करत, "देवाच्या नावाने व सेवाभावाने कार्य करत राहा, हाच खरा जीवनाचा मार्ग आहे," असा प्रेरणादायी संदेश दिला. कार्यक्रमावेळी मार्गदर्शन करताना डॉ. विश्वासराव आरोटे यांनी सहकार, भक्ती आणि विश्वास या तिन्ही घटकांच्या संगमातून संस्थेची प्रगती कशी होते यावर सविस्तर भाष्य केले.

ते म्हणाले की, "शक्ती, भक्ती आणि संतांचा आशीर्वाद जिथे असतो, तिथेच खऱ्या अर्थाने लक्ष्मी नांदते." ह.भ.प. चंद्रकांत डुंबरे महाराज यांच्यावरील प्रेमामुळे राज्यभरातून अनेक मान्यवरांनी या पवित्र सोहळ्यास उपस्थिती लावल्याचे त्यांनी नमूद केले.

डुंबरे महाराजांच्या कार्याचा उल्लेख करताना त्यांनी सांगितले की, "सरकारी सेवेत असतानादेखील त्यांनी मुंबईसारख्या महानगरात नाव कमावले आणि त्याचबरोबर आपल्या गावाकडेही लक्ष दिले. 'जिथं पिकतं तिथं विकत नाही' या उक्तीप्रमाणे गावाशी नाळ जपल्यामुळेच त्यांना सर्वत्र मान-सन्मान मिळाला."

गावातील आध्यात्मिक व सामाजिक परंपरेचा उल्लेख करत त्यांनी पांडुरंग महाराज घुले आणि माधव बाबा यांच्या कार्याची आठवण करून दिली. "गावकऱ्यांनी मठासाठी १२ एकर जागा देऊन दाखवलेला विश्वास हीच खरी ताकद आहे," असे त्यांनी सांगितले.

पतसंस्थेच्या कार्यपद्धतीवर बोलताना त्यांनी स्पष्ट केले की, "आजच्या स्पर्धेच्या युगात केवळ शाखा वाढवून उपयोग नाही, तर लोकांचा विश्वास जिंकणे अत्यंत महत्त्वाचे आहे." माळशेज नागरी पतसंस्थेने राज्यभरात विस्तार करताना सभासदांच्या हिताला प्राधान्य दिल्याचे त्यांनी गौरवाने सांगितले.

त्यांच्या अनुभवाचा उल्लेख करत त्यांनी सांगितले की, "शिपाई ते चेअरमन पर्यंत सर्व पदांवर काम करताना संस्थेची कार्यपद्धती जवळून पाहिली आहे. लाभांश वेळेवर देऊन सभासदांची दिवाळी गोड करण्याचा संस्थेचा ध्यास कौतुकास्पद आहे."

या संस्थेचा विस्तार संपूर्ण महाराष्ट्रभर व्हावा, अधिकाधिक शाखा सुरू व्हाव्यात आणि सहकार चळवळ अधिक बळकट व्हावी, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. "हा वटवृक्ष वाढत राहून सर्वांना सोबत घेऊन जाईल," असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

शेवटी त्यांनी सहकार आणि वारकरी परंपरा अधिक दृढ व्हावी, अशी सदिच्छा व्यक्त करत, "समाजाच्या प्रगतीसाठी विश्वास, सेवा आणि एकोप्याची भावना जपली पाहिजे," असा संदेश दिला.

कार्यक्रमादरम्यान टाळ-मृदुंगाच्या गजरात नामस्मरण, भजन-कीर्तनाने वातावरण अधिकच भक्तिमय झाले होते. महिलांसह युवकांनीही उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. डुंबरवाडी व परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या धार्मिक सोहळ्याचा लाभ घेतला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन कॅनव्हिको हेल्थ केअरचे डायरेक्टर निलेश शेठ आरोटे यांनी केले.

संपूर्ण कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी ह.भ.प. चंद्रकांत महाराज डुंबरे सेवा संस्थेचे पदाधिकारी, सदस्य, संचालक मंडळ व कार्यकर्त्यांनी नियोजनबद्धरीत्या मेहनत घेतली. उपस्थित मान्यवरांनी आयोजकांच्या कार्याचे कौतुक करत अशा धार्मिक व सामाजिक उपक्रमांमुळे समाजात एकोपा व सकारात्मकता वाढते, असे मत व्यक्त केले.

# 'स्वारातीम' विद्यापीठाची २६ वर्षांनंतर सुवर्णझेप

## राष्ट्रीय युवक महोत्सवात ऐतिहासिक यश

**नांदेड जिल्हा : (समर्थ गांवकरी)**

चेन्नई येथे पार पडलेल्या राष्ट्रीय युवक महोत्सवात स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाने तब्बल २६ वर्षांनंतर ऐतिहासिक यश संपादन केले आहे. देशातील आठ झोनमधील १४२ नामांकित विद्यापीठांमध्ये झालेल्या चुरशीच्या स्पर्धेत विद्यापीठाने लोक/आदिवासी नृत्य प्रकारात प्रथम क्रमांक पटकावत सुवर्णपदक मिळवले.

या स्पर्धेत विद्यापीठाने सहभाग घेतलेल्या सर्व सात कलाप्रकारांत पारितोषिके मिळवत १०० टक्के यशाची नोंद केली. यात लोक/आदिवासी नृत्य (दंडार नृत्य) आणि रॅली/मिरवणूक या प्रकारांत प्रथम क्रमांक, माईम (मूक अभिनय), लोक वाद्यवृंद, शास्त्रीय वाद्य एकल आणि लघुनाटिका (स्किट) या प्रकारांत द्वितीय क्रमांक, तर संकल्पना नृत्य प्रकारात पाचवा क्रमांक मिळाला.

या उल्लेखनीय यशामुळे विद्यापीठाचा संघ आता आंतरराष्ट्रीय युवक महोत्सवात भारताचे प्रतिनिधित्व करण्यासाठी पात्र ठरला आहे. विशेष म्हणजे, २६ वर्षांपूर्वी लोकनृत्यात मिळवलेल्या सुवर्णयशाची परंपरा नव्या पिढीने पुन्हा जिवंत केली आहे.



विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. राजपालसिंह चिखलीकर यांच्या नेतृत्वाखाली संघाने अल्पावधीत मोठे आव्हान पेलत हे यश मिळवले. विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करत पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. तसेच प्र-कुलगुरू डॉ. अशोक महाजन, कुलसचिव डॉ. डी. डी. पवार, वित्त व लेखाधिकारी डॉ. राजेश शिंदे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक हुशारसिंह साबळे, अधिष्ठाता डॉ. एम. के. पाटील, डॉ. चंद्रकांत बाविस्कर, आय.आय.एल.चे संचालक डॉ. शैलेश वाढेर, ज्ञानस्त्रोत केंद्राचे संचालक डॉ. जगदीश कुलकर्णी, एन.एन.एस.चे संचालक डॉ. मारोती गायकवाड, आय.क्यू.ए.सी. चे संचालक डॉ. सुरेन्द्रनाथ रेड्डी, कार्यकारी अभियंता तानाजी हुस्सेकर, जनसंपर्क अधिकारी डॉ. अशोक कदम आदी मान्यवरांनी संघाचे कौतुक केले.

संघाचे व्यवस्थापन डॉ. संदीप काळे व सिद्धार्थ नागठाणकर यांनी सांभाळले. लोकनृत्यासाठी संदेश हटकर, तर रॅली व लघुनाटिकेसाठी दिग्दर्शक दिलीप डोम्बे यांनी प्रशिक्षण दिले. डॉ. शिवराज शिंदे यांनी लोकसंगीतासाठी मार्गदर्शन केले. तसेच संकेत गाडेकर आणि संभा कांबळे यांनीही यशासाठी विशेष योगदान दिले.

या अभूतपूर्व यशामुळे संपूर्ण मराठवाड्यात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून, विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषद, अधिसभा सदस्य, विद्यार्थी विकास मंडळ यासह विद्यापीठ परिसरातील संचालक, प्राध्यापक, अधिकारी व कर्मचारी तसेच विविध स्तरांतून विजेत्या विद्यार्थ्यांचे व मार्गदर्शकांचे अभिनंदन होत आहे.

# महावितरणच्या कर्मचाऱ्याला मारहाण प्रकरणी गुन्हा दाखल

**तामसा : (समर्थ गांवकरी)**

थकीत वीज बिल भरणा न करणाऱ्या वीज ग्राहकाचा वीज पुरवठा खंडित करण्याची कारवाई करणाऱ्या महावितरणच्या एका वीज कर्मचाऱ्याला शिवीगाळ करणे, जीवे मारण्याची धमकी देणे, मारहाणीचा प्रयत्न करून शासकीय कामात अडथळा केला प्रकरणी तालुक्यातील दगडवाडी येथील एका वीज ग्राहकाविरुद्ध तामसा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाल्याची घटना दि. 16 रोजी सोमवारी सायंकाळी घडली असून घटनेमुळे वीज ग्राहकांत खळबळ उडाली आहे. मार्च एंडिंगच्या निमित्ताने सगळीकडे वीज महावितरण कंपनीकडून पथक नेमून थकीत वीज बिल वसुली मोहीम युद्धपातळीवर राबवण्यात येत आहे. त्यात हदगाव महावितरण कंपनीचे वीज बील वसुली पथक तालुक्यातील दगडवाडी गावात गेले होते. दगडवाडी येथील ग्राहक संदीप सखाराम वानखेडे यांच्याकडे 9 हजार 560 रुपये वीज बिल थकीत होते. विशेष म्हणजे जानेवारी 2025 पासून आजतागायत, म्हणजेच मागील 429 दिवसांपासून वीज बिल थकीत होते. वारंवार सूचना देऊनही बिल भरण्यास टाळाटाळ केल्यामुळे पथकाने त्यांचा विद्युत पुरवठा खंडित करत असताना वीज ग्राहक अमोल सखाराम वानखेडे याने वीज कंपनीचे वरिष्ठ तंत्रज्ञ दीपक हिंगे या कर्मचाऱ्यांना शिवीगाळ करण्यास सुरुवात केली. एवढ्यावरच न थांबता त्यानी आपल्या भावाला फोन केला, भावाने देखील फोनवरुन शिवीगाळ केली.

# विवो T5x 5G लाँच; मोठी 7200mAh बॅटरी

**पुणे : (समर्थ गांवकरी)**




विवो इंडियाने आपल्या टी-सीरिजमधील नवीन स्मार्टफोन T5x 5G भारतात लाँच केला असून, मोठी बॅटरी आणि उच्च कार्यक्षमतेमुळे हा फोन विशेष चर्चेत आला आहे. या स्मार्टफोनची सुरुवातीची किंमत ₹18,999 ठेवण्यात आली आहे.

परफॉर्मन्सला प्राधान्य देणाऱ्या वापरकर्त्यांसाठी डिझाइन केलेल्या या स्मार्टफोनमध्ये 7200 mAh क्षमतेची बॅटरी देण्यात आली आहे. ही बॅटरी दीर्घकाळ टिकणारी असून रिव्हर्स चार्जिंग सुविधेमुळे फोन पॉवर बँकसारखा वापरता येतो. तसेच 44W फास्ट चार्जिंगमुळे फोन केवळ 43 मिनिटांत 50 टक्क्यांपर्यंत चार्ज होऊ शकतो. कंपनीने या बॅटरीसाठी 6 वर्षांच्या दीर्घकालीन कार्यक्षमतेची हमीही दिली आहे. परफॉर्मन्सच्या बाबतीत, या फोनमध्ये मीडियाटेक डायमेन्सिटी 7400 टर्बो प्रोसेसर देण्यात आला आहे. 4-नॅनोमीटर तंत्रज्ञानावर आधारित हा प्रोसेसर जास्त वापरातही सुरळीत कामगिरी देतो. AnTuTu बेंचमार्कवर 1 मिलियनपेक्षा अधिक स्कोअर मिळाल्यामुळे हा फोन आपल्या सेगमेंटमधील सर्वात वेगवान स्मार्टफोन ठरतो. यामध्ये 8GB पर्यंत एक्सटेंडेड रॅम आणि UFS 3.1 स्टोरेजमुळे ॲप्स जलद उघडणे, मल्टीटास्किंग आणि डेटा ट्रान्सफर अधिक वेगाने होते. कॅमेरा विभागात 50 मेगापिक्सलचा AI-पॉवर्ड मुख्य कॅमेरा आणि 32 मेगापिक्सलचा फ्रंट कॅमेरा देण्यात आला आहे. यामध्ये 4K व्हिडिओ रेकॉर्डिंगची सुविधा असल्यामुळे वापरकर्ते उच्च गुणवत्तेचे फोटो आणि व्हिडिओ सहज टिपू शकतात. टिकाऊपणाच्या दृष्टीने, या फोनला मिलिटरी-ग्रेड प्रमाणपत्र मिळाले असून IP68 आणि IP69+ वॉटर व डस्ट रेसिस्टन्सची सुविधा देण्यात आली आहे. त्यामुळे कठीण परिस्थितीतही फोन सुरक्षित राहतो.

डिस्प्लेबाबत बोलायचे झाल्यास, यात 6.76 इंचाचा FHD+ डिस्प्ले देण्यात आला आहे, जो रोजच्या वापरासाठी आकर्षक आणि स्पष्ट व्ह्यूइंग अनुभव देतो. हा स्मार्टफोन OriginOS 6 वर चालतो, जो वापरकर्त्यांसाठी सहज आणि स्मार्ट अनुभव देतो.

किंमत आणि उपलब्धता :

Vivo T5x 5G हा सायबर ग्रीन आणि स्टार सिल्व्हर या दोन रंगांमध्ये उपलब्ध आहे.

हा स्मार्टफोन 24 मार्च 2026 पासून फ्लिपकार्ट, विवो ई-स्टोअर आणि अधिकृत रिटेल स्टोअर्सवर विक्रीसाठी उपलब्ध होणार आहे.

ग्राहकांना HDFC, Axis, SBI कार्ड्स व UPI पेमेंट्सवर ₹2,000 पर्यंत त्वरित सवलत, 6 महिन्यांपर्यंत नो-कॉस्ट EMI आणि निवडक प्लॅनवर OTT सेवांचा मोफत लाभ मिळणार आहे.

या लॉन्चबाबत बोलताना विवो इंडियाचे वरिष्ठ अधिकारी पंकज गांधी यांनी सांगितले की, T5x 5G हा तरुण ग्राहकांच्या गरजा लक्षात घेऊन तयार करण्यात आला असून, दमदार बॅटरी, उत्कृष्ट परफॉर्मन्स आणि परवडणारी किंमत यामुळे हा स्मार्टफोन बाजारात नवे मानक प्रस्थापित करेल.

## आळंदीत श्री रामनवमी निमित्त श्री रामजन्मोत्सवाचे आयोजन

*आवेकर भावे रामचंद्र संस्थान (ट्रस्ट) तर्फे नारदीय कीर्तन श्रवण पर्वणी*

**आळंदी : (समर्थ गांवकरी)**



येथील आवेकर भावे रामचंद्र संस्थान (ट्रस्ट) तर्फे प्रथा परंपरांचे पालन करीत श्री राम नवमी निमित्त वर्षोकोत्सवात श्री रामजन्मोत्सव सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. या निमित्त गुढी पाडवा ते श्री राम नवमी गुरुवार ( दि. १९ ) ते गुरुवार ( दि. २६ ) या कालावधीत विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. भाविक, नागरिकांनी या सोहळ्यास उपस्थित राहावे असे आवाहन आवेकर भावे रामचंद्र संस्थान ( ट्रस्ट ) तर्फे करण्यात आले आहे.

या वर्षीचा सोहळा हा आता १८६ व्या वर्षात प्रवेश करत आहे, ज्या मध्ये श्री राम मंदिरात संगीत, नृत्य, भजन, नारदीय कीर्तन आणि इतर पारंपारिक कार्यक्रमांचा समावेश आहे. कार्यक्रमात १९ मार्च ते २६ मार्च २०२६ पर्यंत विविध सांस्कृतिक कार्यक्रम आणि धार्मिक सोहळे दररोज आयोजित केले जातील. कार्यक्रमांत रुद्र-अभिषेक, नारदीय कीर्तन, भरतनाट्यम, भजन, रामलीला, संकीर्तन, भक्ति संगीत, आळंदीकर ग्रामस्थ गावकरी भजन सेवा आदींचा समावेश आहे. कार्यक्रमाचा समारोप २६ मार्च २०२६ रोजी श्री राम जन्म कीर्तन आणि श्रींची पालखी नगरप्रदक्षिणा मिरवणुकीने होईल. हा उत्सव भक्तांमध्ये आध्यात्मिक विकास आणि सांस्कृतिक समृद्धी वाढविण्याचे उद्दिष्ट काय ठेवत आहे. संस्थानचे वतीने भाविक, नागरिकांना उत्सवात सहभागी होण्यासाठी आवाहन पंच मंडळाने केले आहे.

## २९ वे नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिर




**जुन्नर तालुका : (समर्थ गांवकरी)**

डिसेंट फाउंडेशन पुणे, शंकरा आय हॉस्पिटल पनवेल व ज्येष्ठ नागरिक संघ,ओतूर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित रविवार दि:- १५ मार्च २०२६ रोजी सकाळी १० ते १ वाजे पर्यंत जिल्हा परिषद प्राथमिक शाळा मुलांची,ओतूर,ता:-जुन्नर येथे संपन्न झाले.सदर शिबिरात एकूण ६७ महिला व पुरुषांची नेत्र तपासणी करण्यात आली, त्यापैकी २२ महिला व पुरुषांना मोतिबिंदू शस्त्रक्रियेसाठी आर झुनझुनवाला शंकरा आय हॉस्पिटल,पनवेल, मुंबई येथे पाठविण्यात आले. सदर शिबिर यशस्वी करण्यासाठी डिसेंट फाऊंडेशन, जुन्नर,पुणे चे अध्यक्ष,जितेंद्र बिडवई व त्यांचे सहकारी,आर झुनझुनवाला शंकरा आय हॉस्पिटल,पनवेल,मुंबई चे शिबिर समन्वयक डॉ.प्रकाश पाटील सर व त्यांचे सहकारी यांनी अथक परिश्रम घेतले. शिबिरा साठी नांव नोंदणी चे महत्वाचे काम बाबाजी डुंबरे, सचिव व आत्माराम खराडे, सहसचिव,सभासद शांताराम पानसरे यांनी मोलाचे सहकार्य केले.ज्येष्ठ नागरिक संघ, ओतूरचे अध्यक्ष रा.ज्ञा.डुंबरे,उपाध्यक्ष किसन फापाळे व दत्तात्रय डुंबरे,कार्याध्यक्ष मा.ल. जाधव,संचालक सर्वश्री रामदास ढमाले,बबन डुंबरे,कांचन थोरात सल्लागार सर्वश्री प्रभाकर काका तांबे,वसंत आप्पा डुंबरे, बाळासाहेब हाडवळे हे उपस्थित होते.

## घरगुती गॅसचा व्यावसायिकांचा सर्रास वापर

**तामसा : (समर्थ गांवकरी)**

आखाती देशात सुरू असलेल्या युद्धामुळे सर्व दूर गॅस टंचाईचा सदृश्य पाहायला मिळत आहे. त्याच्या विपरीत तामसा परिसरात घरगुती गॅसचा छोटे व्यवसायिकाकडं सर्रास वापर होत आहे. गॅस टंचाईचा सावट असून व्यावसायिक गॅस चा वापर करणाऱ्या मोजक्या व्यवसायाकडे नाम मात्र ठेवलेल्या व्यावसायिक गॅसची टंकी दर्शनीय भागात ठेवून अक्षरशः घरगुती गॅसचा वापर उघडपणे वापरल्या जात आहे. व्यावसायिक गॅसच्या किमतीत घरगुती गॅस पेक्षा दुप्पट रक्कम मोजावं लागते म्हणून या व्यवसायिकाकडून पहिल्यापासून घरगुती गॅसचा वापर होत होता. परंतु आता टंचाई भासत असताना व्यावसायिक गॅस कड मागणी वाढली असून शासनाचा व्यवसायिक गॅस सुद्धा बंद करण्यात आलं आहे.

## राष्ट्रीय महामार्गावर टिपर व दुचाकीचा अपघात

### एका युवकाचा जागीच मृत्यु

- **जिल्हाधिकारी यांनी राष्ट्रीय महामार्गावरील सहा महिन्यापूर्वी बंद केलेल्या ठिकाणी घडला अपघात**

**मुखेड : (समर्थ गांवकरी)**



नांदेड - बिदर (१६१ अ )या राष्ट्रीय माहामार्गारील विठ्ठल मंदिर जवळ लेंडी धरणातील काळ्या मातीची वहातुक करणाऱ्या टिपरने एका दुचाकीवरून प्रवास करणाऱ्या युवकाच्या दुचाकीला जोराची धडक दिली व युवक खाली कोसळला असता त्यावरून टिपर गेल्यामुळे युवकाचा जागीच मृत्यु झाला असल्याची घटना दि.१६ मार्च रोजी दुपारी ३ वजण्याच्या सुमारास घडली आहे. याबाबत सविस्तर वृत्त असे की, राष्ट्रिय महामार्ग क्र १६१ अ वरील निवळी शिवारात विठ्ठल मंदिराजवळ महामार्गावरील पुलाचे काम रखडले आहे. त्यामुळे याठिकाणी रस्ता अरुंद आहे त्यामुळे हा अपघात घडल्याचे समजते यापुर्वीही याठिकाणी अनेक अपघात झाले आहेत आजपर्यंत ११ ते १२ नागरीकांचा याच ठिकाणी मृत्यु झाला आहे येथील पुलाचे काम न झाल्यामुळे असे अपघात सतत घडत आहेत पावसाळ्यात नाल्याचे पाणी जाऊन येथिल रस्ताही खचला गेला त्या कारणाने जिल्हयाचे जिल्हाधिकारी यांनी सहा महिन्यापूर्वी एक आदेश काढून हा महामार्ग बंद केला. परंतु तो फक्त कागदावरच बंद राहीला या रस्त्यावरून फक्त महामंडळाची बस वगळता सर्वच वहातुक अगदी सुरळीतपणे चालू आहेत उदाहरणार्थ रेतीचे टिपर , उसाचे ट्रॅक्टर, विटाचे ट्रक यासह सर्वच प्रकारची जड वहातुक या ठिकाणी चालू आहेत. त्यातच दि.१६ मार्च रोजी दु.३ वाजण्याच्या सुमारास भेंडेगाव (बु) येथिल युवक संतोष रामराव कांबळे (२५) हा बाऱ्हाळीकडे दुचाकी क्र. एम.एच.२६ एक्स १३८४ वरून येत असताना पाठीमागुन भरधाव वेगाने येणारा टिपर क्र.एम.एच.२४ ए.बी.८८८० विठ्ठल मंदिर जवळील त्याच नाल्यावर दुचाकी व त्यावरील युवकाला चिरडून गेले त्यात युवकाचा जागीच मृत्यू झाला.अशा घटना या महामार्गावर या ठिकाणी वारंवार घडत आहेत त्यात अनेकांचा जीव जाऊन संसार उघड्यावर पडत असताना प्रशासन मात्र याबाबत काही उपायोजना न करता केवळ बघ्याची भूमिका घेत आहे. त्यामुळे अजून किती लोकांचा जीव गेल्यावर याठिकाणी थांबलेले काम पूर्ण करणार असा प्रश्न या भागातील जनता विचारत आहे.

## बाणेरमध्ये फेदरलाइटचे अनुभव केंद्र सुरू

- **आधुनिक कार्यस्थळांना नवी दिशा**

**पुणे : (समर्थ गांवकरी)**



कार्यस्थळ आणि शैक्षणिक संस्थांसाठी फर्निचर उपाय देणाऱ्या फेदरलाइट समूहाने पुण्यातील बाणेर येथे १०,००० चौ. फूटांचे आधुनिक अनुभव केंद्र सुरू केले आहे. या केंद्रामुळे उद्योग, शैक्षणिक संस्था आणि सरकारी विभागांना आधुनिक कार्यस्थळ रचना प्रत्यक्ष पाहण्याची संधी मिळणार आहे. या अनुभव केंद्राचे उद्घाटन पंचशील रियल्टीचे संचालक सागर चोरडिया यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी फेदरलाइट समूहाचे व्यवस्थापकीय संचालक मनोहर गोपाल, संचालक लव जे. चेल्लार्म, सहसंचालक किरण डी. चेल्लार्म आणि व्यवसाय प्रमुख नितीन घाग यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. बाणेरमधील मध्यवर्ती ठिकाणी उभारण्यात आलेल्या या केंद्रामध्ये आधुनिक कार्यालयीन व शैक्षणिक फर्निचरचे विविध नमुने सादर करण्यात आले आहेत. यामध्ये आरामदायी आसन व्यवस्था, सहकार्यपूर्ण कार्यालय रचना, तंत्रज्ञानयुक्त वर्गखोल्या, प्रयोगशाळा टेबल, ग्रंथालय व्यवस्था तसेच सभागृहातील आसन व्यवस्था यांचा समावेश आहे. यावेळी बोलताना मनोहर गोपाल म्हणाले, “या केंद्राद्वारे आम्ही उद्योग, शैक्षणिक संस्था आणि सार्वजनिक क्षेत्राला अधिक प्रभावी सेवा देण्याचा प्रयत्न करत आहोत. आधुनिक कार्यस्थळांचा अनुभव येथे प्रत्यक्ष घेता येईल.” संचालक लव चेल्लार्म यांनी सांगितले की, आज फर्निचर हे केवळ सजावटीचे साधन नसून काम करण्याची पद्धत, संवाद आणि विचारप्रक्रिया घडवणारे महत्त्वाचे माध्यम बनले आहे. तर सहसंचालक किरण चेल्लार्म यांनी ग्राहकांच्या बदलत्या गरजांनुसार लवचिक आणि उपयुक्त रचना तयार करण्यावर भर असल्याचे सांगितले. या केंद्रात आरामदायी, लवचिक आणि आरोग्यदायी रचना, केबल व्यवस्थापन, मॉड्यलर प्रणाली आणि जागेचा कार्यक्षम वापर यावर विशेष लक्ष देण्यात आले आहे. तसेच पर्यावरणपूरक उत्पादन प्रक्रिया, सौरऊर्जेचा वापर आणि पुनर्वापरावरही कंपनी भर देत आहे. फेदरलाइटने उद्योग, शैक्षणिक संस्था, आर्किटेक्ट आणि उद्योजकांना या अनुभव केंद्राला भेट देण्याचे आवाहन केले आहे. आधुनिक कार्यपद्धती आणि बदलत्या गरजांनुसार भविष्यातील कार्यस्थळांचे स्वरूप कसे असेल, याचा अनुभव या केंद्रातून घेता येणार आहे.

## मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड यांचा नांदेड दौरा

**नांदेड : (समर्थ गांवकरी)**

राज्याचे मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड हे नांदेड जिल्हा दौऱ्यावर येत असून त्यांचा दौरा कार्यक्रम पुढीलप्रमाणे राहील. गुरुवार 19 मार्च 2026 रोजी सकाळी 10 वा. जि. यवतमाळ मोवाडा येथून हेलिकॉप्टरने धनोडा हेलिपॅड ता. माहूर जि. नांदेडकडे प्रयाण. सकाळी 10.55 वा. धनोडा हेलिपॅड येथे आगमन व शासकीय वाहनाने धनोडा उच्च पातळी बंधारा साईट, ता. माहूर जि. नांदेड कडे प्रयाण. सकाळी 11 वा. धनोडा उच्च पातळी बंधाऱ्यांच्या उदघाटन कार्यक्रमास उपस्थिती. स्थळ- धनोडा उच्च पातळी बंधारा साईट, ता. माहूर जि. नांदेड . सकाळी 11.55 वा. धनोडा उच्च पातळी बंधारा येथून शासकीय वाहनाने धनोडा हेलिपॅड कडे प्रयाण. दुपारी 12 वा. धनोडा हेलिपॅड येथे आगमन व हेलिकॉप्टरने शंकर लोदी हेलिपॅड ता. जिवती जि. चंद्रपूरकडे प्रयाण करतील.

## नन्ही कली किटचे वाटप व उद्घाटन



**जुन्नर तालुका : (समर्थ गांवकरी)**

भाऊसाहेब बोरा आणे माळशेज विद्यालय मढ विद्यालयाच्या इमारतीचारंगकाम उद्घाटन समारंभ आणि नन्ही कली ८० किटचे वाटप गुरुवार दिनांक ५ मार्च रोजी दुपारी तीन वाजता वा.संपन्न करण्यातआला श्रीरंगदास स्वामी शिक्षण विकास मंडळ आणे संस्थेचे अध्यक्ष श्रीप्रकाशजी बोरा अध्यक्षस्थानी आणि उपाध्यक्ष जितेंद्रजी बोरा तसेच रोटरी क्लब जुन्नर शिवनेरीचे सन्मान नीय धनंजय राजूरकर सहाय्यक प्रांतपाल झोन ४मिलिंद घोडेकर अध्यक्ष रोटरी क्लब जुन्नर शिवनेरी,प्रशांत खत्री सचिव रोटरी क्लब जुन्नर शिवनेरी, विनायक भागवत खजिनदार रोटरी क्लब जुन्नर शिवनेरी व अतुल कुलकर्णी जीडीबी इंटरनॅशनल आणि हॉटेल कुबेर चे मालक कुंडलिक सदाकाळ, पंचायत समिती सदस्य महेंद्र सदाकाळ,सरपंच अरुणा मस्करे या सर्व सन्मानियांच्या हस्ते रंगकाम उद्घाटन समारंभ सोहळा संपन्न करण्यात आला. प्राचार्य.संजय राणे,मोढवे सर व विद्यालयाचे सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी,विविध समित्यांचे पदाधिकारी,समस्त ग्रामस्थ मढ बारागांव उपस्थित होते विद्यार्थ्यांनी पारंपारिक पद्धतीने लेझीम ढोल ताशांच्या गजरात पाहुण्यांचे स्वागत केले.

## बुधवारी अर्धापूर येथे पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळाव्याचे आयोजन

**नांदेड: (समर्थ गांवकरी)**

जिल्ह्यातील बेरोजगार उमेदवारांना रोजगाराची संधी उपलब्ध व्हावी यासाठी जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र नांदेड व शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था अर्धापूर यांच्या संयुक्त विद्यमाने बुधवार 18 मार्च 2026 रोजी शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था अर्धापूर येथे पंडित दीनदयाळ उपाध्याय प्लेसमेंट ड्राईव्ह/रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. या प्लेसमेंट ड्राईव्ह / रोजगार मेळाव्यामध्ये विविध खाजगी आस्थापनामध्ये रोजगार व नोकरीच्या संधी साठी मुलाखती घेण्यात येणार असून जिल्ह्यातील बेरोजगार उमेदवारांनी बुधवार 18 मार्च 2026 सकाळी 10 वा. पासून औद्योगिक प्रशिक्षण संस्था, अर्धापूर येथे उपस्थित राहून या संधीचा लाभ घ्यावा असे आवाहन सहायक आयुक्त, जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र नांदेड यांनी केले आहे. अधिक माहिती व संपर्कासाठी मा. सहायक आयुक्त, जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, आनंदनगर रोड, बाबानगर नांदेड ईमेल आयडी nandedrojgar01@gmail.com दूरध्वनी क्रमांक 02462-251674 व सोनल मात्रे 8830807312 वर संपर्क साधावा, असे आवाहन कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता सहायक आयुक्त डॉ. रा. म. कोल्हे यांनी केले आहे.

## चार दिवसीय शास्त्रीय उपकरण हाताळणी कार्यशाळा संपन्न

**जुन्नर तालुका : (समर्थ गांवकरी)**



ओतूर तालुका जुन्नर येथील अण्णासाहेब वाघिरे महाविद्यालयात अंतर्गतगुणवत्ता हमी कक्ष व रसायनशास्त्र विभाग यांच्या वतीने डीबीटी स्टार कॉलेज कार्यक्रम अंतर्गत चार दिवसीय अद्ययावत शास्त्रीय उपकरण हाताळणे कार्यशाळा संपन्न झाल्याची माहिती महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रमेश शिरसाट यांच्यामार्फत देण्यात आली. सदर कार्यशाळेच्या उद्घाटन कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य व रासायशास्त्र विभाग प्रमुख डॉ. रमेश शिरसाट हे होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष प्रमुख डॉ. योगेश्वर काळदंते यांनी केले, त्यांनी विज्ञान व तंत्रज्ञान विभाग भारत सरकारच्या अनुदानातून विकसित केलेल्या प्रयोगशाळेतील अत्याधुनिक उपकरणांबद्दल तसेच महाविद्यालयात राबविल्या जाणाऱ्या इतर विविध योजनांविषयी माहिती दिली. सदर कार्यक्रम प्रसंगी महाविद्यालयाचे प्राणिशास्त्र विभागातील डॉ. राहुल पाटील वनस्पतीशास्त्र विभागातील डॉ. पवन हांडे, श्री शिवछत्रपती महाविद्यालय जुन्नर येथील प्रा. संदिप थोरवे, किन्हवली महाविद्यालय येथील प्रा. महेश नलावडे हे देखील उपस्थित होते.

कार्यशाळेच्या पहिल्या दिवशी यूव्ही.डी.आर.एस. व एफ.टी. आय.आर., एच.पी.एल.सी. व जी.सी. इत्यादी अद्ययावत उपकरणांची सखोल माहिती अनुक्रमे प्रा. रत्नमाला मोरे, प्रा. सुवर्णा डुंबरे , प्रा. रोहिदास मेमाणे व प्रा. स्वप्राली दांगट यांनी विद्यार्थ्यांना सांगितली. कार्यशाळेच्या दुसऱ्या दिवशी श्री शिवछत्रपती कॉलेज जुन्नर येथील प्रा. विकास कदम यांनी मास स्पेक्ट्रोमेट्री व प्रा. संदीप थोरवे यांनी एस.ई.एम तसेच प्रा. श्वेताली कुलकर्णी यांनी ए.ए.एस उपकरण तसेच भौतिक शास्त्र विभाग येथील डॉ. कोळेकर यांनी एक्स. आर. डी. या उपकरणांची सखोल माहिती विद्यार्थ्यांना सांगितली. कार्यशाळेच्या तिसऱ्या दिवशी डॉ. धनंजय गडगे यांनी एफ टी आय आर उपकरण हाताळण्याचे प्रशिक्षण विद्यार्थ्यांना दिले तसेच जी सी उपकरण हाताळण्याचे प्रशिक्षण प्रा. स्वप्राली दांगट यांनी दिले तसेच एस टी एफ आर उपकरण हाताळण्याचे प्रशिक्षण प्रा. रत्नमाला मोरे यांनी दिले. कार्यशाळेच्या चौथ्या दिवशी डॉ. योगेश्वर काळदंते यांनी विद्यार्थ्यांना महाविद्यालयात डीएसटी प्रयोगशाळेत उपलब्ध असलेल्या यूव्ही डी आर एस व प्रा. रोहिदास मेमाणे यांनी एच पी एल सी या उपकरणांची हाताळणी व घ्यावयाची काळजी याबद्दल प्रशिक्षण दिले. सदर कार्यशाळा ही ऑफलाइन पद्धतीने राबवली असून सदर कार्यशाळेस श्री शिवछत्रपती कॉलेज जुन्नर व बाळासाहेब जाधव कॉलेज आळे येथील 28 विद्यार्थी सहभागी झाले होते. विद्यार्थ्यांनी कार्यशाळेबद्दल सकारात्मक अभिप्राय दिला असून अशा कार्यशाळा वारंवार व्हाव्यात असे मत व्यक्त केले या कार्यशाळेच्या समारोपप्रसंगी डॉ. राहुल पाटील, डॉ. पवन हांडे तथा रसायनशास्त्र विभागाचे सर्व प्राध्यापक, श्री शिवछत्रपती कॉलेज जुन्नर येथील प्रा. थोरवे सर उपस्थित होते. यावेळी डॉ. योगेश्वर काळदंते यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले तसेच रसायनशास्त्र विभागातील प्रा. सुवर्णा डुंबरे यांनी आभार व्यक्त केले. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी रसायनशास्त्र विभागातील शिक्षकेतर कर्मचारी यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. स्वप्राली दांगट यांनी केले तर प्रमाणपत्र वितरण वाचन प्रा. रत्नमाला मोरे यांनी केले. सदर कार्यशाळा महाविद्यालयाचे प्राचार्य व डीबीटी स्टार कॉलेज योजना प्रमुख डॉ. रमेश शिरसाट तसेच वरिष्ठ प्राध्यापक व महाविद्यालयाचे नॅक कॉर्डिनेटर डॉ. एकनाथ कबाडी यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झाली.या कार्यक्रमासाठी पुणे जिल्हा शिक्षण मंडळाच्या सर्व पदाधिकाऱ्यांचे मोलाचे मार्गदर्शन मिळाले

# ग्रामपंचायत ताब्यात द्या तरच सुचवलेली कामे मार्गी लावू

## आमदार काशिनाथ दाते : पिंपळगाव रोठा गावाच्या विकासाला नवी गती

**पारनेर : (समर्थ गांवकरी)**

नव्याने सुचवत असलेल्या विकास कामांना मी ग्रामपंचायत निवडणुकीपर्यंत कोणताही प्रतिसाद देणार नाही तुम्ही ग्रामपंचायत ताब्यात द्या सर्व सुचविलेली कामे मंजूर करून देण्याची जबाबदारी माझी असे मत आमदार काशिनाथ दाते यांनी व्यक्त केले. पारनेर तालुक्यातील पिंपळगाव रोठा गावाच्या सर्वांगीण विकासाला चालना देणाऱ्या सुमारे १.५ कोटी (दीड कोटी) रुपयांच्या विविध विकासकामांचा भव्य भूमिपूजन सोहळा रविवार, दि. १५ मार्च २०२६ रोजी मोठ्या उत्साहात संपन्न झाला. पारनेर-नगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार काशिनाथ दाते सर यांच्या हस्ते या कामांचे श्रीगणेशा करण्यात आला.



यावेळी पिंपळगाव रोठा येथे युवा नेते गोपीनाथ घुले व मित्रपरिवाराने आमदार काशिनाथ दाते यांची जंगी स्वागत केले.

यावेळी भूमिपूजन प्रसंगी आमदार काशिनाथ दाते यांच्या समवेत कोरठण खंडोबा देवस्थानचे माजी अध्यक्ष ॲड. पांडुरंग गायकवाड, खरेदी विक्री संघाचे माजी चेअरमन बाबासाहेब खिलारी, ज्येष्ठ नेते साहेबराव वाफारे, डॉ. प्रदीप दाते, राष्ट्रवादीचे नेते पंढरीनाथ उंडे, उद्योजक धनंजय निमसे, देवराम मगर, माजी सरपंच रंगनाथ फापाळे, माजी सरपंच संजीवनी आंधळे, अरुण राजदेव, अक्षय गोरडे, शुभम टेकूडे, उद्योजक जालिंदर खोसे, युवा नेते गोपीनाथ घुले, ॲड. संतोष वाळुंज, दादाभाऊ पुंडे, नामदेव गायकवाड, तान्हाजी मुळे, गोरख जगताप, प्रदीप खोसे, दिलीप घुले, आशिष ढोमे, शिवाजी ढोमे, राजाराम पुंडे, भगवान भांबरे, ज्ञानदेव सुंबरे सर, शमशुद्दीन हवालदार, आदी यावेळी उपस्थित होते. यावेळी पुढे बोलताना आमदार दाते म्हणाले की मी जिल्हा परिषद मध्ये सभापती असताना पिंपळगाव रोठा गावासाठी कोट्यावधीची कामे दिली आहेत.

पाठीमागील काळात जिल्हा परिषद निवडणूक व विधानसभा निवडणुकीमध्ये पिंपळगाव रोठा गावाने चांगली साथ दिली आहे. यापुढील काळातही येणाऱ्या जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांमध्ये सुद्धा माझ्या सहकाऱ्यांना तुम्ही साथ द्या असेही आमदार दाते म्हणाले तसेच पुढे बोलताना ते म्हणाले

मतदारसंघातील प्रत्येक गावाचा शाश्वत विकास करणे हे आमचे ध्येय आहे. पिंपळगाव रोठा गावासाठी मंजूर झालेला हा निधी केवळ सुरुवात असून, भविष्यातही गावच्या प्रगतीसाठी निधीची कमतरता भासू दिली जाणार नाही. तुम्ही सुचवत असलेल्या विकास कामे मार्गी लावण्यासाठी कटिबद्ध आहे. पिंपळगाव रोठा येथे आमदार काशिनाथ दाते यांच्या माध्यमातून विकासकामे मार्गी लागत आहेत. पिंपळगाव रोठा उपसा सिंचन योजनेच्या सर्वेक्षणाला सुद्धा आमदार दाते यांच्या माध्यमातून मंजुरी मिळाली आहे. गेल्या अनेक दिवसांपासूनचा असलेला प्रश्न मार्गी लागत आहे. यापुढील काळातही पिंपळगाव रोठा परिसरामध्ये विकास कामे मार्गी लावण्यासाठी आमदार दातेंकडे पाठपुरावा करणार आहे.

# आरटीई २५ टक्के प्रवेश प्रक्रियेसाठी ऑनलाईन अर्जास २५ मार्चपर्यंत मुदतवाढ

## आता ३ ते ५ किमी अंतरावरील शाळांचे पर्याय निवडण्याची संधी

**ठाणे : (समर्थ गांवकरी)**

शिक्षणाचा हक्क कायद्याअंतर्गत (आरटीई) खासगी विनाअनुदानित शाळांमधील २५ टक्के राखीव प्रवेश प्रक्रियेत महत्त्वपूर्ण बदल करण्यात आले असून ऑनलाईन अर्ज भरण्याची मुदत आता दि. २५ मार्च, २०२६ पर्यंत वाढविण्यात आली आहे. तसेच पालकांना आता ३ ते ५ किलोमीटर अंतरावरील शाळांचे पर्याय निवडण्याची संधी उपलब्ध करून देण्यात आली आहे. मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाच्या निर्देशानुसार शाळेच्या अंतरासंबंधीची १ किलोमीटरची अट शिथिल करण्यात आली आहे. त्यामुळे पूर्वी केवळ १ किमी अंतरातील शाळा निवडण्याची मर्यादा असताना आता पालकांना अधिक पर्याय उपलब्ध होणार आहेत. या निर्णयामुळे अधिकाधिक पात्र बालकांना इच्छित शाळांमध्ये प्रवेश मिळण्यास मदत होणार आहे. तसेच, दि. १६ मार्च, २०२६ पर्यंत ज्या पालकांनी आरटीई २५ टक्के प्रवेशासाठी ऑनलाईन अर्ज भरले आहेत, त्यांना अर्जामध्ये आवश्यक दुरुस्ती करण्यासाठी 'अनकन्फर्म' करून पुन्हा 'कन्फर्म' करण्याची सुविधा पोर्टलवर उपलब्ध करून देण्यात आली आहे. याबाबत संबंधित पालकांना पोर्टलवर पॉप-अप विंडोच्या माध्यमातून सूचना देण्यात आल्या आहेत. याबाबत शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद ठाणे बाळासाहेब राक्षे यांनी सांगितले की, "आरटीई २५ टक्के प्रवेश प्रक्रियेत अधिकाधिक पात्र बालकांचा समावेश व्हावा, यासाठी शासनाच्या निर्देशानुसार अर्ज भरण्याची मुदत दि. २५ मार्च, २०२६ पर्यंत वाढविण्यात आली आहे. तसेच शाळांच्या अंतराची अट शिथिल केल्यामुळे पालकांना अधिक पर्याय उपलब्ध झाले आहेत. सर्व पात्र पालकांनी या मुदतवाढीचा लाभ घेऊन ऑनलाईन अर्ज सादर करावेत." तरी सर्व संबंधित पालकांनी या मुदतवाढीचा लाभ घेऊन अर्जामध्ये आवश्यक दुरुस्ती करून अथवा नवीन अर्ज सादर करून प्रवेश प्रक्रिया पूर्ण करावी, तसेच क्षेत्रीय स्तरावरील अधिकारी व शाळांनी ही माहिती जास्तीत जास्त पालकांपर्यंत पोहोचवावी, असे आवाहन शिक्षण विभागामार्फत करण्यात आले आहे.

# हॉटेलवर प्रशासनाचा छापा; ५ घरगुती गॅस सिलिंडर जप्त

**पारनेर : (समर्थ गांवकरी)**

पारनेर शहरात घरगुती गॅस सिलिंडरचा व्यावसायिक कारणांसाठी बेकायदा वापर करणाऱ्या हॉटेल चालकांवर महसूल आणि पुरवठा विभागाने मोठी कारवाई केली आहे. जिल्हा पुरवठा अधिकारी हेमा बढे यांच्या आदेशानुसार आणि तहसीलदार गायत्री सौंदाणे यांच्या मार्गदर्शनाखाली पुरवठा निरीक्षण अधिकारी प्रविण वाढई व त्यांच्या पथकाने शहरातील २० हॉटेल्सची अचानक तपासणी केली. या धडक मोहिमेत ५ घरगुती गॅस सिलिंडर जप्त करण्यात आले असून, प्रशासनाच्या या कारवाईमुळे अवैध गॅस वापरणाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत. जागतिक स्तरावर निर्माण झालेल्या युद्धजन्य परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर घरगुती एलपीजी गॅसचा पुरवठा सुरळीत राहावा आणि त्याचा काळाबाजार रोखला



जावा, यासाठी जिल्हा प्रशासनाने कडक पावले उचलण्याचे निर्देश दिले आहेत. पारनेर शहरात अनेक ठिकाणी घरगुती गॅसचा व्यावसायिक वापर होत असल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. त्या अनुषंगाने तहसीलदार गायत्री सौंदाणे यांच्या पथकाने ही मोहीम राबवली. तपासणी दरम्यान काही नामांकित हॉटेल्समध्ये नियमबाह्य पद्धतीने घरगुती सिलिंडर वापरले जात असल्याचे पथकाच्या निदर्शनास आले, त्यानंतर तातडीने हे सिलिंडर जप्त करण्यात आले.

> व्यवसायिकांनी घरगुती गॅस वापरू नये नियमित तपासणी केली जाईल तसे आढळल्यास व सोशल मीडियावर चुकीची माहिती पसरवल्यास कडक कारवाई केली जाईल. कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवू नका आणि गॅस सिलिंडरचा विनाकारण साठा करू नका. साठेबाजी करणाऱ्या वर कारवाई केली जाईल.
>
> **- प्रविण वाढई**
> **पुरवठा निरीक्षक, पारनेर**

केंद्र व राज्य शासनाच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार घरगुती गॅसचा अवैध वापर रोखण्यासाठी आता विशेष दक्षता पथके आणि फिरती पथके तैनात करण्यात आली आहेत. गॅस एजन्सींची देखील तपासणी करण्याच्या सूचना शासनाने दिल्या आहेत.

# सार्वजनिक सुट्टीच्या दिवशी दस्त नोंदणी राहणार सुरू

**नांदेड जिल्हा : (समर्थ गांवकरी)**

आर्थिक वर्ष संपत येत असल्याने व नूतन वर्षानिमित्त लोकांचा मालमत्ता खरेदी करण्याकडे जास्त कल असतो. त्यामुळे दस्तनोंदणीचे प्रमाण वाढण्याची शक्यता असल्याने गुरुवार 26 मार्च, शनिवार 28 मार्च, रविवार 29 मार्च व मंगळवार 31 मार्च 2026 या सार्वजनिक सुट्टीच्या दिवशी दुय्यम निबंधक कार्यालय चालू राहणार आहेत. ज्या कार्यालयांची साप्ताहिक सुट्टी शनिवार व रविवार सोडून अन्य दिवशी आहे ती कार्यालय त्यांच्या दोन साप्ताहिक सुट्ट्यांपैकी एक दिवस चालू राहतील. या दिवसासाठी दुय्यम निबंधक कार्यालयांवर नियंत्रण.

# वासनांध 'महाराजा'च्या अमानुष कृत्याने ढवळपुरी पेटले

- गाव कडकडीत बंद ठेवत ग्रामस्थांचा संतापाचा उद्रेक!
- नराधम यशवंत थोरातचा पुतळा जाळून कठोर शिक्षेची मागणी

**पारनेर : (समर्थ गांवकरी)**



अहिल्यानगर जिल्ह्यातील पारनेर तालुक्यातील ढवळपुरी गाव मंगळवारी एका संतापजनक घटनेच्या निषेधार्थ पूर्णपणे बंद राहिले. श्री दुर्गादेवी वारकरी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष यशवंत एकनाथ थोरात उर्फ अण्णासाहेब गुंजाळ (महाराज) याने एका १७ वर्षीय अल्पवयीन मुलीवर गेल्या पाच वर्षांपासून अमानुष अत्याचार केल्याचे समोर आल्याने संपूर्ण जिल्हा हादरला आहे. या नराधम 'महाराजा'ने पीडितेचे केवळ लैंगिक शोषणच केले नाही, तर तिला गरम लोखंडी पक्कडीने चटके देऊन तिचा शारीरिक छळही केला. या क्रूर कृत्यामुळे संतापलेल्या ग्रामस्थांनी मंगळवारी सकाळी ग्रामपंचायत समोर एकत्र येत आरोपीच्या पुतळ्याचे दहन केले आणि घोषणाबाजीने परिसर दणाणून सोडला.

या आंदोलनाचे नेतृत्व करणाऱ्या सरपंच नंदाताई गावडे यांनी आपल्या भावना व्यक्त करताना सांगितले की, ज्या हातांनी मुलांना संस्कार द्यायचे, त्याच हातांनी एका निरागस मुलीचे आयुष्य उद्ध्वस्त करणे हे अत्यंत नीच कृत्य आहे. अशा भोंदू महाराजांना समाजात कोणतेही स्थान नसावे आणि कायद्याने त्याला कठोर शासन करावे, तरच अशा प्रवृत्तींना आळा बसेल . आंदोलनात सहभागी झालेल्या महिलांनीही तीव्र संताप व्यक्त केला. पीडितेला दिलेले चटके हे माणुसकीवर ओढलेले ओरखडे आहेत, अशा नराधमाला भरचौकात फाशीची शिक्षा झाली पाहिजे, अशी मागणी एका संतप्त महिला ग्रामस्थाने केली. गावातील तरुणांनीही या घटनेमुळे वारकरी संप्रदायाची प्रतिमा मलिन झाल्याचे सांगत, आरोपीला कोणत्याही परिस्थितीत पाठिशी घालू नये, असा पवित्रा घेतला.

या घटनेने पारनेर तालुक्यात सामाजिक अस्वस्थता पसरली असून, दुकाने आणि सर्व व्यवहार पूर्णपणे बंद ठेवून ग्रामस्थांनी पीडितेला न्याय देण्याची मागणी केली आहे. पीडितेच्या फिर्यादीवरून पारनेर पोलिसांनी रविवारी पहाटेच आरोपीला अटक केली असून, सध्या पोलीस या प्रकरणाचा सखोल तपास करत आहेत. सामाजिक कार्यकर्ते आणि महिला संघटनांनी हा खटला जलदगती न्यायालयात चालवून नराधम थोरातला लवकरात लवकर सजा देण्याची मागणी केली आहे.

# अवैध वाळू उपसा जोरात; प्रशासनाचे दुर्लक्ष, ग्रामस्थ संतप्त

**पारनेर : (समर्थ गांवकरी)**

अहमदनगर जिल्ह्यातील पारनेर तालुक्यात मुळा नदीपात्र, काळू नदीपात्र आणि मांडओहोळ नदीपात्रातून अवैध वाळू उपसा आणि वाहतूक सध्या बेसुमार सुरू आहे. दररोज मोठ्या प्रमाणात वाळू तस्करी होत असतानाही पारनेर तहसीलदार, महसूल प्रशासन आणि पारनेर पोलीस यांच्याकडून हेतूपुरस्सर दुर्लक्ष केले जात असल्याचा आरोप ग्रामस्थ करत आहेत. यामुळे पर्यावरणाचे नुकसान होत असून, स्थानिक रस्त्यांची अवस्था दयनीय झाली आहे. या अवैध कारवायांना तातडीने आळा बसवावा आणि दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी संबंधित गावातील नागरिक करत आहेत. टाकळी ढोकेश्वर परिसरातील वासुंदे चौकातून आणि ढवळपुरी फाट्यावरून खुलेआम वाळू वाहतूक सुरू आहे. पोखरी, देसवडे, मांडवे, पळशी, तास, वनकुटे



या भागातील मुळा नदीपात्रात आणि मांडओहोळ नदीपात्रातील वासुंदे (शिक्री) परिसरात तसेच काळू धरणावरील नदीपात्रातील ठाकरवाडी व ढवळपुरी भागात गेल्या काही दिवसांपासून अवैध वाळू उपसा जोरात चालू आहे. या ठिकाणी अवजड डंपर आणि ट्रक रात्रंदिवस फिरत आहेत. अनेक संघटनांनी याबाबत तहसीलदार आणि पोलिसांना लेखी निवेदन दिले तरीही अद्याप कोणतीही ठोस कारवाई झालेली नाही.

ग्रामस्थांनी सांगितले की, जेव्हा काही गावांमध्ये वाळू उपसा बंद करण्याची मागणी केली जाते, तेव्हा वाळू तस्करांकडून जिवे मारण्याची धमकी किंवा दमबाजी दिली जाते. यामुळे स्थानिक लोक भीतीच्या सावटाखाली जगत आहेत. अवैध वाळू वाहतुकीमुळे सततच्या अवजड वाहनांच्या ये-जा होत असल्याने परिसरातील रस्ते पूर्णपणे खराब झाले आहेत. रस्ते दुरुस्ती केल्यानंतरही काही दिवसांतच खड्ड्यांनी भरले जातात. यामुळे स्थानिक नागरिक आणि वाहन चालकांना प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे.

विशेष म्हणजे, नदीपात्रातून वाळू उपसा केल्यानंतर वाळू धुण्याचे आड्डे रस्त्याच्या कडेलाच उघड्यावर चालू आहेत. तरीही कोणत्याही महसूल किंवा पोलीस अधिकाऱ्याला हे दिसत नाही, हे नवलच आहे. याशिवाय, वाळू वाहतूक करणाऱ्या अनेक डंपरवर नंबर प्लेटसुद्धा नसतात, तरीही ते सर्रास वाहतूक करत आहेत. याकडे आरटीओ प्रशासनाचेही पूर्ण दुर्लक्ष आहे. सामान्य नागरिकांमध्ये एक सवाल उपस्थित झाला आहे की, इतक्या मोठ्या प्रमाणात अवैध वाळू उपसा आणि वाहतूक सुरू असताना कोणताही अधिकारी कारवाईसाठी दिसत नाही. ही वाळू तस्करी कोणाच्या आशीर्वादाने चालू आहे? यात काही देवाण-घेवाण तर चालू नाही ना? असा प्रश्न तालुक्यातील लोक विचारत आहेत.

# जंगम मालमत्तेच्या विक्रीचा ई-लिलाव

**नांदेड : (समर्थ गांवकरी)**

प्रादेशिक परिवहन कार्यालय, यांच्यावतीने वायुवेग पथकामार्फत प्रादेशिक परिवहन कार्यालय नांदेड व इतर ठिकाणी अटकावून असलेल्या व वाहनधारकामार्फत सोडविण्यात न आलेल्या वाहनाची ई-लिलाव प्रक्रीया ऑनलाईन पध्दतीने https://www.eauction.gov.in या संकेतस्थळावर करण्यात येणार आहे. त्याचा सांकेतांक क्रमांक 2026_ MH_33493 असा आहे. ई-लिलाव प्रक्रीयासंबंधी सविस्तर तपशील प्रक्रीया, दिनांक व वेळ पुढीलप्रमाणे आहे. ई-लिलाव ऑनलाईन/ऑफलाईन कागदपत्रे नोंदणीची सुरवात 20 मार्च रोजी सकाळी 11 वा. होईल तर 27 मार्च 2026 रोजी दुपारी 1 वा. समाप्त होईल. ई-लिलाव ऑनलाईन/ऑफलाईन प्राप्त कागदपत्रे पडताळणी व मंजूरीबाबत सुरवात 20 मार्च सकाळी 11 वा.तर 27 मार्च 2026 रोजी दुपारी 5 वा. समाप्त होईल.

# अभयारण्यात आढळले दुर्मीळ 'मोठे तमालपत्र'

**जुन्नर तालुका : (समर्थ गांवकरी)**

भीमाशंकर अभयारण्य परिसरात दुर्मीळ अशा मोठ्या आकारात तमालपत्र सिनेमोमम मॅक्रोफिलम या वनस्पतीचा शोध लावण्यात आळे ता:-जुन्नर येथील वनस्पती अभ्यासक दाम्पत्य सविता आणि संजय रहांगडाळे यांना यश आले आहे 'संवर्धनासाठी संशोधनाची गरज - संजय रहांगडाळे या शोधामुळे पश्चिम घाटातील जैवविविधते बाबत नवी माहिती उपलब्ध झाली असून,या दुर्मीळ प्रजातीच्या संवर्धनासाठी पुढील संशोधनाची आवश्यकता आहे, असे डॉ.संजय रहांगडाळे यांनी सांगितले. १०-१५ वर्षांपूर्वी साधारण २०१० ते २०१२ या कालावधीत भीमाशंकर परिसरात वनस्पती वैविध्याच्या अभ्यासासाठी अनेक वेळा भेटी दिल्या.या काळात काही झाडांचे नमुने गोळा करून त्यांचे हर्बेरियम नमुने तयार करण्यात आले. त्यानंतर उपलब्ध वैज्ञानिक



साहित्याचा अभ्यास करून; तसेच देश-विदेशातील हर्बेरियम संग्रहांशी तुलना केली. त्यानंतर वनस्पतीची रचना,पानांवरील शिरांची मांडणी,खोडाचीवैशिष्ट्ये आदी बाबींचा सखोल अभ्यास केल्यानंतर प्रजाती 'सिनेमोमम मॅक्रोफिलम' असल्याचे निश्चित झाले असे डॉ.सविता रहांगडाळे वनस्पती अभ्यासक यांनी सांगितले. या संशोधनात प्रामुख्याने क्षेत्रीय संशोधन, हर्बेरियम नमुन्यांची तुलना आणि दीर्घकालीन निरीक्षण या मुद्यांच्या आधारे रहांगडाळे दाम्पत्याने; तसेच भारतीय वनस्पती सर्वेक्षण संस्थेतील संशोधक जयंती यांनी या प्रजातीची ओळख निश्चित केली आहे. तमालपत्र या वंशातील सुमारे ३५ प्रजाती भारतात आढळतात. त्यापैकी अनेक प्रजाती पश्चिम घाट परिसरात स्थानिक स्वरूपात आढळत आहेत.मूळची तमालपत्र (सिनेमोमम मॅक्रोफिलम) ही प्रजाती इंडोनेशिया येथील मानली जाते.यापूर्वी भारतात तिची नोंद केवळ अंदमान आणि निकोबार बेटांवर मर्यादित स्वरूपात झालेली होती,असे डॉ.रहांगडाळे दांपत्याने ' दैनिक 'समर्थ गावकरी'ला सांगितले. ते म्हणाले,आता मात्र ही वनस्पती महाराष्ट्रातील भीमाशंकर परिसरातआढळल्या मुळे तिचा भौगोलिक विस्तार वाढल्याचे स्पष्ट झाले आहे. विशेषतःभारताच्या मुख्य भूभागावर या प्रजातीचा हा आढळ पहिल्यांदाच नोंदविलेला गेला आहे.

# आता पैसे द्या, उद्या गॅस मिळवा'... सिलिंडरचा नवा स्कॅम...सावध

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

देशभरात LPG Gas सिलिंडरचे संकट वाढत असताना, स्कॅमर्स आता सिलिंडरची गरज असलेल्या लोकांना टार्गेट करीत आहेत आणि वेगवेगळे फसवणुकीचे मार्ग शोधत आहेत. या स्कॅम्समध्ये बऱ्याच लोकांना पकडण्यात यश आले आहे. स्वयंपाकाच्या गॅसला जास्त मागणी असल्याने, हे फसवणूक करणारे असे मेसेज पाठवत आहेत जे आपण आगाऊ पैसे भरल्यास सुपर-फास्ट डिलिव्हरीचा दावा करतात. 'आता पैसे द्या, उद्या गॅस मिळवा' ही ओळ व्हॉट्सॲप चॅट्स, SMS आणि सोशल मीडियावर दिसून येते. LPG Gas सिलिंडरच्या नावाखाली लोकांना फसवणूक करणारे व्हॉट्सॲप चॅट्स, SMS येत आहेत. अशा प्रकारच्या अनेक तक्रारी आल्या असून तुम्ही देखील सावध राहणं अत्यंत गरजेचं आहे.




LPG Gas सिलिंडर वितरणाच्या नावाखाली लोकांची लाखो रुपयांची फसवणूक होत आहे. इंडेन, भारत गॅस, HP GAS आणि सर्वांनी अलर्ट दिला आहे की ते घातक लिंक किंवा संदेशांद्वारे कधीही आगाऊ देयके विचारत नाहीत. जर एखाद्याला सिलिंडर हवा असेल (SMS किंवा लिंक किंवा यादृच्छिक क्रमांकावरून कॉल), तर त्वरित त्याची तक्रार करा.

# 'सरस विक्री प्रदर्शनात' ग्रामीण महिलांच्या उत्पादनांची विक्रमी कामगिरी

**ठाणे : (समर्थ गांवकरी)**

ग्रामीण भागातील महिलांनी उत्पादित केलेल्या वस्तूंना हक्काची बाजारपेठ उपलब्ध करून देण्यासाठी आयोजित करण्यात आलेल्या "जिल्हास्तरीय सरस व मिनी सरस विक्री प्रदर्शनाला" नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत ५१.१७ लाख रुपयांची विक्रमी विक्री झाली आहे. जिल्हास्तरीय सरस व मिनी सरस विक्री प्रदर्शनात उत्तम कामगिरी करणाऱ्या बचत गटातील महिलांचा सन्मान दि. १६ मार्च, २०२६ रोजी बी.जे. हायस्कुल, ठाणे येथे करण्यात आला. मुख्य कार्यकारी अधिकारी रणजित यादव यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, ठाणे आणि महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (MSRLM) यांच्या संयुक्त विद्यमाने वज्रेश्वरी महोत्सवाअंतर्गत



हे प्रदर्शन दि. १० ते १४ मार्च २०२६ दरम्यान यशवंतराव चव्हाण मैदान (मॅक्सी ग्राऊंड), कर्णिक रोड, कल्याण (प) येथे आयोजित करण्यात आले होते.

या प्रदर्शनामध्ये स्वयं सहाय्यता समूहातील महिलांनी तयार केलेल्या विविध खाद्यपदार्थ, हस्तकला वस्तू, वस्त्रनिर्मिती उत्पादने आणि घरगुती वापराच्या वस्तूंचे एकूण १०० स्टॉल्स उभारण्यात आले होते. यामध्ये १० खाद्यपदार्थांचे स्टॉल्स तसेच ९० हस्तकला, कपडे व घरगुती वस्तूंचे स्टॉल्स समाविष्ट होते. या प्रदर्शनात २१० हून अधिक महिलांनी सहभाग नोंदवला. या प्रदर्शनास कल्याण, ठाणे तसेच इतर जिल्ह्यांमधील सुमारे १२,००० नागरिकांनी भेट दिली. नागरिकांनी मोठ्या प्रमाणावर खरेदी करत महिलांच्या उत्पादनांना भरभरून प्रतिसाद दिला. विशेष म्हणजे, अनेक स्वयं सहाय्यता समूहांना प्रदर्शनादरम्यान इतर ग्राहकांकडून पुढील ऑर्डर्सही प्राप्त झाल्या, ज्यामुळे त्यांच्या व्यवसायवृद्धीस नवे दालन खुले झाले आहे.

याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी रणजित यादव म्हणाले की, "ग्रामीण महिलांनी अत्यंत गुणवत्ता व कल्पकतेने तयार केलेल्या उत्पादनांना योग्य बाजारपेठ मिळाल्यास त्या आर्थिकदृष्ट्या सक्षम होऊ शकतात, हे या प्रदर्शनातून स्पष्ट झाले आहे. 'उमेद' अभियानाच्या माध्यमातून महिलांना स्वावलंबी बनविण्यासाठी जिल्हा प्रशासन कटिबद्ध आहे. अशा उपक्रमांमुळे महिलांच्या उत्पन्नात वाढ होऊन त्यांच्या जीवनमानात सकारात्मक बदल घडत आहेत. भविष्यातही अशा अधिक संधी उपलब्ध करून देण्यासाठी आम्ही प्रयत्नशील राहू."

तसेच प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा अजिंक्य पवार म्हणाले की, "सरस विक्री प्रदर्शनाला नागरिकांकडून मिळालेला प्रतिसाद अत्यंत उत्साहवर्धक आहे. ५१.१७ लाख रुपयांची विक्री ही महिलांच्या मेहनतीची आणि गुणवत्तेची साक्ष आहे. या माध्यमातून महिला बचत गटांना केवळ बाजारपेठच नव्हे तर व्यवसायवृद्धीसाठी नवे मार्गही उपलब्ध झाले आहेत. पुढील काळात अशा प्रदर्शनांचे अधिक प्रभावी नियोजन करून महिलांना अधिक संधी देण्यात येतील."

या प्रदर्शनाच्या माध्यमातून ग्रामीण महिलांना थेट ग्राहकांशी संवाद साधण्याची संधी, उत्पादनांची गुणवत्ता सादर करण्याची संधी आणि डिजिटल तसेच प्रत्यक्ष बाजारपेठेत प्रवेश मिळाला आहे. यामुळे महिला बचत गटांचे सक्षमीकरण अधिक बळकट होत असल्याचे स्पष्ट झाले आहे. जिल्हा परिषद ठाणे अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (उमेद) या उपक्रमामुळे ग्रामीण महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणाला चालना मिळत असून त्यातून महिलांच्या जीवनात सकारात्मक बदल घडत आहेत.